आतील पानात...
३ डोणजे येथे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान
४ राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची जयंती कार्यक्रमांनी साजरी
५ मुस्लीम बांधवांचा इज्तेमा सुरेगावला होणार

पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

शनिवार, दि. २८ मार्च २०२६ | वर्ष : १३ | अंक : ३३४ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

पान ८ वर..




# राज्यात १ जानेवारी २०११ पर्यंतची सरकारी जागेवरील निवासी अतिक्रमणे नियमित होणार

## देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा अभूतपूर्व निर्णय

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : राज्यातील सरकारी जागेवरील २०११ पर्यंतची अनधिकृत निवासी बांधकामे नियमित करण्याचा मोठा निर्णय सरकारने घेतला आहे. यामुळे अनेकांच्या घरावरील कारवाईची टांगती तलवार हटली आहे. २०११ पर्यंत झालेली आणि सध्या केवळ घरांसाठी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी झाला आहे.

या शासन निर्णयानुसार, कोणत्याही परिस्थितीत भारताचा नागरिक नसलेल्या व्यक्तीचे अतिक्रमण नियमित होणार नाही. याची दक्षता अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने घ्यायची आहे. असे अतिक्रमण आढळल्यास पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सरकारने घेतलेला हा निर्णय मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून संपूर्ण राज्यासाठी लागू आहे. यात ५०० चौरस फुटांपर्यंतचे निवासी अतिक्रमण पूर्णपणे विनामूल्य नियमानुकूल करण्यात येणार आहे तर उर्वरित क्षेत्रासाठी प्रचलित बाजारमूल्याच्या केवळ दहा टक्के रक्कम कब्जेहक्काची रक्कम म्हणून आकारली जाईल. नदीपात्र, नाले, गायरान, सार्वजनिक



रस्ते, वने, स्मशानभूमी, खेळण्याचे मैदान किंवा शाळा/रुग्णालयासाठी आरक्षित असलेल्या जमिनींवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमित केली जाणार नाहीत. अशा बाधित कुटुंबांना 'प्रधानमंत्री आवास योजने'तून पर्यायी घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

तसेच अतिक्रमण नियमित करण्यासाठीची पात्रता, अटी व शर्ती, जागेची मर्यादा व शुल्क आकारणी, अंलबजावणीची कार्यपद्धती, अर्जासाठीची मुदत, पडताळणी, अंमलबजावणी यंत्रणा अशी सर्व यंत्रणा सज्ज करण्यात येणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने यासाठी अनेक बैठका घेतल्या गेल्या. 'सर्वांसाठी घरे' हे धोरण आणि 'विकसित महाराष्ट्र २०४७' चे उद्दिष्ट गाठण्यासाठी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश असल्याचं सांगण्यात येते. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. यामुळे वेगवेगळ्या शासन मान्यतेची गरज पडणार नाही. या समित्याच निर्णय घेतील. जिल्हास्तरावर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १७ सदस्यांची समिती असून विधानसभा क्षेत्रनिहाय आमदारांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापण्यात येणार आहेत.

### पात्रतेसाठी काय आहेत अटी?

- जमीन पती –पत्नी यांच्या संयुक्त नावाने 'भोगवटादार वर्ग–२' म्हणून दिली जाईल.
- ग्रामीण तसेच शहरी भागात जास्तीत जास्त १५०० चौ. फुटापर्यंतचे क्षेत्र नियमित
- जास्त असलेले अतिक्रमण पाडण्यात येईल.
- ५०० चौ. फुटापर्यंतची सर्व निवासी अतिक्रमणे पूर्णपणे विनामूल्य नियमित
- घराचा काही भाग व्यवसायासाठी वापरत असल्यास बाजारमूल्याच्या २५% रक्कम
- जमिनीच्या नोंदणीसाठी १००० चौ. फुटापर्यंत १००० रुपये शुल्क
- १ जानेवारी २०११ पूर्वीच्या वास्तव्यासाठी मतदार यादी, वीज बिल, मालमत्ता पावती ग्राह्य
- गेल्या १ वर्षातील रहिवासाचा पुरावा बंधनकारक

## संक्षिप्त

### राज्यात ऊन–पावसाचा खेळ सुरूच

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : राज्याच्या कमाल तापमानात हळूहळू वाढ होत आहे. गेले काही दिवस अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला होता. त्यानंतर आता तापमानात वाढ होऊन उन्हाचा चटका जाणवू लागला आहे. मात्र काही भागांमध्ये दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात विजांसह वादळी पावसाची शक्यता असून कोकणात उष्ण व दमट हवामानाचा अंदाज असल्याने यलो अलर्ट देण्यात आला आहे.

अकोला येथे देशातील उच्चांकी ३९.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तसेच निफाड येथील गहू संशोधन केंद्रात राज्यातील नीचांकी १४.४ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले. आज मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात विजांसह वादळी पाऊस, तसेच कोकणातील ठाणे, मुंबई आणि रायगड या जिल्ह्यांत उष्ण लाटेचा व दमट हवामानाची शक्यता असल्याने येलो अलर्ट हवामान विभागाने दिला आहे. उर्वरित राज्यात उन्हाचा चटका वाढण्याची शक्यता आहे.

भंडारा जिल्ह्यात १७ ते २३ मार्च दरम्यान झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे रब्बी पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील ७६.३० हेक्टरवरील पिके जमीनदोस्त झाली असून शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला आहे. एकट्या लाखनी तालुक्यातील १६ गावांमधील शेती प्रभावित झाली असून १७५ शेतकऱ्यांचे प्राथमिक नुकसान नोंदवण्यात आले आहे.

### महसूल विभागात मोठा जमिन घोटाळा उघड

महानगरी प्रतिनिधी

मुंबई : महसूल विभागात जमिनींच्या फेरफाराबाबत एक घोटाळा उघडकीस आला आहे. महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून चक्क शेतकऱ्यांच्या जमिनी दुसऱ्यांच्या नावावर केल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. याप्रकरणी प्राथमिक चौकशीनंतर काही दोषी अधिकाऱ्यांना तातडीने सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले असून, त्यांच्यावर कडक कारवाईचे संकेत दिले आहेत. आज (शुक्रवार) मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी ही माहिती दिली.

महसूल नियमांनुसार, कलम १५५ अंतर्गत तहसीलदारांना केवळ जमिनीच्या सातबाऱ्यावरील नावातील स्पेलिंग किंवा शुद्धलेखनातील किरकोळ चुका दुरुस्त करण्याचे अधिकार आहेत. मात्र, पुणे विभागात या अधिकाराचा मोठा गैरवापर झाला आहे.

## दैवी शक्तीचा बहाणा करून महिलेवर अत्याचार; भोंदू फरार

**जनप्रवास । प्रतिनिधी**



पुणे : नाशिकमधील भोंदू अशोक खरात याने महिलांवर अत्याचार केल्याचे प्रकरण ताजे असतानाच दैवीशक्तीचा संचार असल्याची बतावणी करुन एका भोंदूने महिलेवर अत्यचाार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी वसईतील माणिकपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित गुन्हा तपासासाठी पुण्यातील मांजरी पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला असून भोंदू पसार झाला.

याबाबत एका ३५ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, भोंदू ऋषीकेश वैद्य याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला मूळची पुण्यातील आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये महिलेची समाज माध्यमातून तिची ओळख झाली. आरोपी वैद्य हा मूळचा वसईचा आहे.

पीडित महिला व्रतवैकल्ये करायची, तसेच ती धार्मिक आहे. भोंदूने तिला जाळ्यात ओढले. माझ्यात दैवी संचार आहे. ईश्वराची उपासना कशी करायची, याचे तंत्र तुला शिकवितो, अशी बतावणी त्याने महिलेकडे केली. त्यानंतर त्याने महिलेला जाळ्यात ओढले. आरोपी २०२३ मध्ये पुण्यात आला. त्याने पीडित महिलेची भेट घेतली. मांजरी परिसरात तो तिला भेटला. त्यानंतर त्याने गुंगीचे औषद देऊन तिच्यावर बलात्कार केला. आरोपीने तिला पुन्हा वसईत बोलावले. वसईतही तिच्यावर बलात्कार केला, असे महिलेने फिर्यादीत म्हटले आहे.

## कोथरूडमध्ये विराट हिंदू संमेलन उत्साहात; गणेश शिंदे यांच्या भाषणाने श्रोते भारावले

### मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी स्वत:च्या हातातील घड्याळ गणेश शिंदे यांच्या हाती बांधून केला सन्मान

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : रामनवमीच्या निमित्ताने कोथरूड येथील जीत मैदानावर आयोजित विराट हिंदू संमेलनाला श्रोत्यांची प्रचंड गर्दी उसळली होती. तुडुंब भरलेल्या मैदानात आणि सभागृहात उत्साहपूर्ण वातावरण अनुभवायला मिळाले.

या संमेलनात वक्ते गणेश शिंदे यांनी आपल्या प्रभावी आणि ओजस्वी शैलीत निसर्ग, समाज आणि अर्थकारण या विविध विषयांना स्पर्श करत श्रोत्यांना भावनिक साद घातली. ऐतिहासिक दाखले देत त्यांनी सद्य परिस्थितीची सांगड घालत विचार मांडले. आज सगळं जग युद्धाच्या उंबरठ्यावर उभं असताना संतांचे



विचारच मानवजातीला तारू शकतात, असा आशय व्यक्त करत त्यांनी श्रोत्यांना विचारप्रवृत्त केले.

त्यांच्या भाषणादरम्यान कधी टाळ्यांचा कडकडाट, कधी स्तब्ध शांतता, तर कधी श्रोत्यांच्या डोळ्यांत अश्रू दिसून आले. संपूर्ण वातावरण अक्षरशः भारावून गेले होते.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मंत्री चंद्रकांत दादा पाटील उपस्थित होते. भाषणाच्या शेवटी त्यांनी स्वत: उभे राहून टाळ्यांचा कडकडाट करत शिंदे यांच्या वक्तृत्वाचे मनापासून कौतुक केले. त्यानंतर ते शिंदे यांच्या जवळ जाऊन त्यांनी आपल्या हातातील घड्याळ त्यांच्या हातात बांधत विशेष सन्मान केला.

या प्रसंगी प्रतिक्रिया देताना गणेश शिंदे म्हणाले, दादा, ही वेळ कायम लक्षात राहील.

या प्रेरणादायी क्षणामुळे संमेलनातील उपस्थितांमध्ये उत्साह, अभिमान आणि प्रेरणेचे वातावरण निर्माण झाले.

## रामनवमी मिरवणुकीतील वादातून रिक्षाचालकावर हल्ला

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : रामनवमी मिरवणुकीदरम्यान झालेल्या वादातून रिक्षाचालकावर धारदार हत्याराने हल्ला करण्यात आल्याची घटना बी.टी. कवडे रोड परिसरात घडली. या प्रकरणी मुंढवा पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे.

अक्षय आनंद गवळी (३०, रा. कात्रज) असे जखमीचे नाव असून त्याच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी त्याचा भाऊ अजिंक्य गवळी (२७, रा. घोरपडी) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी काशीराम मोघे, अभिषेक मोघे, नंदू थोरात व त्यांच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिरवणुकीत बॅनर लावण्याच्या कारणावरून वाद झाला होता. त्याच रागातून आरोपींनी जाधव वस्ती परिसरात अक्षय गवळी याला अडवून डोके, पोट व हातावर वार करत गंभीर जखमी केले.

पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्मिता वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दहशत निर्माण झाली असून नागरिकांमध्ये भय निर्माण झाले आहे.


## हिर्डोशी–वरंधा घाट मार्ग सव्वा महिना बंद; पर्यायी मार्गांची व्यवस्था

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : राष्ट्रीय महामार्गावरील हिर्डोशी ते वरंधा घाट दरम्यान रस्त्याच्या रुंदीकरण व काँक्रिटीकरणाच्या कामामुळे २५ मार्च ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत हा मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

भोर–महाड मार्गावरील या कामासाठी कार्यकारी अभियंत्यांनी प्रस्ताव दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी रस्ता बंद करण्याचे आदेश दिले. दरडप्रवण व धोकादायक वळणांचा भाग असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आला आहे.

या काळात पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांसाठी माणगाव–निजामपूर–ताम्हिणी घाट–मुळशी–पिरंगुट–पुणे असा पर्यायी मार्ग सुचविण्यात आला आहे. तर कोल्हापूरकडे जाण्यासाठी पोलादपूर–महाबळेश्वर–वाई–सातारा–कराड किंवा पोलादपूर–खेड–चिपळूण–पाटण–कराड असे मार्ग उपलब्ध करण्यात आले आहेत.



दरम्यान, परिसरातील गावांचा संपर्क लक्षात घेऊन स्थानिकांसाठी काही ठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. या महामार्गाशी धामणदेव, कारुंगण, हिर्डोशी, सोमजाई माळ, टाक्या माळ, वारवंड, शिरगाव, अशिंपी, उंबर्डेवाडी, उंबर्डेगाव आणि शिळीम अशी अनेक गावे जोडलेली आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन हालचाली लक्षात घेऊन पूर्ण बंदीऐवजी आवश्यक त्या ठिकाणी मर्यादित पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली जाणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## पीएनजी गॅस बंद करण्याची भीती दाखवून ८.५१ लाखांची सायबर फसवणूक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : पीएनजी गॅस पुरवठा खंडित करण्याची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी कोथरूडमधील एका ज्येष्ठ नागरिकाची तब्बल ८ लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणी संबंधित ६२ वर्षीय नागरिकाने कोथरूड पो–लीस ठाण्यात फिर्याद दिली असून अज्ञात सायबर गुन्हेगारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदाराला गॅस बिल थकीत असल्याचा बनावट संदेश पाठवण्यात आला. गॅस पुरवठा बंद होऊ नये यासाठी तातडीने



ऑनलाइन पैसे भरण्याची सूचना देत चोरट्यांनी एक लिंक पाठवली. ती लिंक उघडताच आरोपींनी मोबाईलचा ताबा घेत बँक खात्यातील रक्कम हस्तांतरित केली. मोबाईल क्रमांक बँक खात्याशी जोडलेला असल्याने आरोपींनी ८.५१ लाख रुपये दुसऱ्या खात्यात वळवले. फसवणूक लक्षात येताच नागरिकाने पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल माने करत आहेत.

## लॉकडाऊनची अफवा पसरवाल तर खबरदार; फडणवीसांची तंबी


**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : अमेरिका–इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर देशात इंधन पुरवठ्याबाबत निर्माण झालेल्या चिंतेवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. 'पल्स' या वैद्यकीय परिषदेनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहन केलंय.

मुख्यमंत्र्यांनी सांगितलं की, पेट्रोल आणि डिझेलवरील एक्साईज ड्युटी १० रुपयांनी कमी करण्यात आली आहे. कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमतींचा परिणाम तेल कंपन्या आणि केंद्र सरकार स्वत: सहन करत असल्यामुळे सामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही. त्यामुळे इंधन दरांमध्ये अनावश्यक वाढ होणार नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलंय.

देशात पेट्रोल पंपांवर लागलेल्या रांगांबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, सध्या कोणतीही टंचाई नाही. भारताकडे सुमारे एका महिन्याचा पुरेसा इंधनसाठा उपलब्ध आहे. नागरिकांनी घाबरून जास्त प्रमाणात पेट्रोल–डिझेल खरेदी केल्यास पुरवठा आणि मागणी यामध्ये ताण निर्माण होऊ शकतो आणि कृत्रिम टंचाई उद्भवू शकते. त्यामुळे नेहमीप्रमाणेच इंधन भरावं, असं आवाहन त्यांनी केलंय.

त्याचप्रमाणे लॉकडाऊन लागणार





नाही हे केंद्र सरकारने जाहीर केलंय, जे लोकं अशा अफवा पसरवतील त्या लोकांवर फौजदारी कारवाई केली जाईल. अशा पद्धतीची खोटी माहिती सोशल मीडियावर पाठवणाऱ्यावर फौजदारी कारवाई होऊ शकते, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

भारताच्या शेजारचे देश यांचा उल्लेख करत सांगितलं की, काही शेजारी देशांमध्ये गॅस आणि पेट्रोलच्या कमतरतेमुळे ऑफिस आणि इंस्टिट्यूट बंद ठेवण्याची वेळ आली आहे. मात्र, भारताने योग्य नियोजन आणि मॅनेजमेंट करत इंधन आणि घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवला आहे. कमर्शियल गॅस सिलेंडरच्या पुरवठ्याबाबत फडणवीस म्हणाले की, तो आधी २० टक्क्यांवर होता, जो आता ४० टक्क्यांपर्यंत वाढला असून लवकरच ५० टक्क्यांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. यावेळी फडणवीस यांनी आरोग्य क्षेत्रातील प्रगतीवरही भाष्य केलंय. राज्यातील प्रत्येक नागरिकाला ५ ते ८ किलोमीटरच्या अंतरात दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितलं. डिजिटल महाराष्ट्र आणि विकसित महाराष्ट्र या संकल्पनांमध्ये आरोग्य क्षेत्राचा मोठा वाटा असल्याचंही त्यांनी नमूद केलंय

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून अधिक चांगल्या सुविधा देण्यावर भर असून, विशेष रुग्णालयं उभारण्याचं नियोजन सुरू आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी राज्यात सीट्स वाढवण्याचा निर्णय घेतला असून, त्यानुसार आवश्यक पायाभूत सुविधा उभारल्या जातील. कॅन्सरसाठी स्वतंत्र रुग्णालये उभारण्याचाही सरकारचा मानस आहे. इनोव्हेशन, कोलॅबोरेशन आणि क्लिनिकल रिसर्च यांना चालना देण्यासाठी 'पल्स' परिषद महत्त्वाची भूमिका बजावेल, असं सांगत त्यांनी मेडिकल वेलनेस टुरिझमलाही प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचं म्हटलंय.

# अग्रलेख : ऊर्जेबाबत आत्मनिर्भरतेची निकड...!

भारतीय सत्ताकारणात सध्या आत्मनिर्भरता हे पालुपद चर्चेचे झाले आहे. प्रत्येक क्षेत्रात भारत आत्मनिर्भर होईल, असा विश्वास केंद्र सरकारकडून व्यक्त केला जात आहे. भारत स्वावलंबी असावा यासाठी आग्रह धरणे अथवा तसे लक्ष्य ठेवले जाणे यात यत्किंचितही काही चुकीचे नाही. प्रत्येक भारतीयासाठी ती अभिमानाचीच बाब असेल. मात्र पश्चिम आशियात गेल्या महिन्यात सुरू झालेल्या इस्त्रायल-अमेरिका आणि इराण युद्धानंतर अवघ्या काही दिवसांतच भारतात ऊर्जा संकट उभे ठाकले आणि यात तरी आपण आत्मनिर्भर नक्कीच नाही, याची जाणीव भारताला झाली. विशेषत: इंधनाच्या बाबतीत आपण पूर्णपणे परावलंबी आहोत आणि ती परिस्थिती देशाची मोठी कोंडी ठरते, हे आता समोर येऊ लागले आहे. गॅसटंचाईने तर हॉटेलसह विविध व्यवसायांवर मोठा परिणाम झाला आहेच, दुसरीकडे आता पेट्रोल, डिझेलच्या बाबतीतही नाही म्हटले तरी टंचाईचा सामना करावा लागत आहे.

सरकार काहीही दावे करत असले तरी अवाढव्य लोकसंख्येच्या या देशात पेट्रोल पंपांवर लागलेल्या वाहनांच्या रांगा, स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरसाठी उसळलेल्या गर्दीचे चित्र वास्तव स्पष्ट केल्याशिवाय राहात नाही. जनतेत यामुळे आता सरकारबाबत अविश्वास निर्माण होऊ लागला आहे. ही स्थिती आणखी काही दिवस अशीच राहिली तर किती भीषण परिस्थिती निर्माण होऊ शकते याची कल्पना सरकारलाही आहे. या पार्श्वभूमीवर ज्या भागात पाईपद्वारे नैसर्गिक वायू पोहोचला आहे अशा ठिकाणच्या कुटुंबांनी त्याचे कनेक्शन घेण्यास नकार दिला तर त्यांचा एलपीजी सिलिंडरचा पुरवठा बंद करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सरकारने घेतला. गॅस पाईपलाइन नेटवर्कचा विस्तार आणि एकाच इंधनावरील अवलंबित्व कमी करणे हा दुहेरी उद्देश त्यामागे असल्याचे म्हटले जात आहे. अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षानंतर आपल्या ऊर्जेची गरज भागवण्यासाठी आता चौकटीबाहेर जाऊन विचार करण्याची गरज असल्याचे केवळ भारताच्याच नव्हे संपूर्ण जगाच्याच लक्षात आले. या संकटामुळे जागतिक ऊर्जाविषयक चर्चा निर्णायकपणे स्वयंपूर्णतेकडे वळली आहे.

युरोप, युनायटेड किंगडम आणि जपानने त्यांच्या देशांतर्गत निर्बंध लादले आहेत तर हा व्यत्यय दीर्घकाळ टिकणारा आणि संरचनात्मकदृष्ट्या नुकसानकारक असल्याचा इशारा आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेने दिला. इंधन पुरवठ्याची कमतरता आणि पायाभूत सुविधांच्या नुकसानीचा परिणाम हा संघर्ष संपल्यानंतरही बाजारांवर दीर्घकाळ टिकून राहू शकतो. म्हणूनच या संदर्भात भारतही ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दिशेने अधिक प्रयत्न करत आहे. कदाचित हाच आपल्यासाठी सर्वोत्तम पर्याय असल्याने त्यासाठीच्या प्रयत्नांना विद्यमान उपक्रमांनी गेल्या वर्षापासूनच गती घेतल्याचा दावा केंद्र सरकार करत आहे.

सध्याच्या भू-राजकीय घडामोडी आणि वाढत्या चिंतांमुळे या प्रयत्नांना आता अधिक गती मिळाली आहे. या बदलाचे सर्वात स्पष्ट उदाहरण इंडियन नॅचरल गॅस कॉर्पोरेशनकडे पाहिल्यास मिळते. अलीकडील त्याच्या अनेक उपक्रमांवरून भारत यासंदर्भात मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करत असल्याचे दिसत आहे. खोल समुद्रातील ड्रिलिंग रिग्ज भाड्याने घेण्यासाठी सुमारे २० अब्ज डॉलरची जागतिक निविदा काढण्याचा या कॉर्पोरेशनचा निर्णय भारताच्या प्रवाही धोरणातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या योजनेची प्रचंड व्याप्ती आणि केवळ ८० दिवसांत रिग्ज तैनात करण्याची निकड ही भारताच्या इतिहासात क्वचितच दिसणारी गतिशीलता दर्शवते.

या प्रकल्पात उत्पादनक्षम आणि नवीन अशा दोन्ही इंधनविहिरींचा समावेश आहे. ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन कृष्णा-गोदावरी खोऱ्यातील सक्रियता वाढवत असतानाच अंदमान बेटांच्या अति-खोल समुद्रातील भागांमध्येही प्रवेश करत आहे. वास्तविक हे भाग पूर्वीपासून आशादायक मानले जात असले तरी तेथे संसाधनांची कमतरता होती. बिनी, मोबिल टोटलर्जीज आणि पेट्रोबास यासारख्या कंपन्यांसोबतची भागीदारी, गुंतागुंतीच्या सागरी प्रदेशांचा वेगाने उलगडा करण्यासाठी तंत्रज्ञान आणि कौशल्य आयात करण्याची भारताची इच्छा दर्शवते. हा केवळ पाईपलाइनचा विस्तार नसून ती एक धोरणात्मक झेप आहे. खोल समुद्रातील वायू विहिरी हे प्रकरण महागडे आणि अनिश्चित असले तरी त्यात महत्त्वपूर्ण साठे शोधण्याची क्षमता आहे आणि ते सापडले तर ते भारताच्या ऊर्जा संतुलनात परिवर्तन घडवू शकतात, यासाठीची अब्जावधी डॉलरची गुंतवणूक ही ऊर्जा सुरक्षेसाठीची राष्ट्रीय प्राथमिकता ठरत असल्याचे दर्शवत आहे. स्वयंपाकाच्या गॅसवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकार आता इथेनॉलचा वापर करण्याचीही तयारी करत आहे. यासाठी इथेनॉल आधारित स्वयंपाकाच्या चुली विकसित करण्याचेही काम सुरू आहे.

हा प्रकल्प अद्याप प्राथमिक टप्प्यात असला तरी सौरऊर्जा आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वाढता वापर ही या दिशेने महत्त्वाची पावले ठरू शकतात. पुरवठा साखळीची समस्या कायम असताना आपण सध्या इलेक्ट्रिक वाहनांसाठी चीनवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहोत. अशा परिस्थितीत ऊर्जा सुरक्षेसाठी आत्मनिर्भरता हा सर्वोत्तम पर्याय आहे. जागतिकीकरणाच्या या युगात पुरवठा साखळ्यांसाठी जग परस्-परावलंबी झाले आहे तेव्हा असे स्त्रोत वैविध्यपूर्ण करणे आणि केवळ एकाच स्रोतावर अवलंबून राहणे टाळणे हेच अधिक महत्त्वाचे ठरणारे आहे.

# शांत व्हा अन्यथा कारस्थाने बाहेर काढू



## राजधानीतून

## सुनील तटकरे यांचा रोहित पवारांना निर्वाणीचा इशारा





’कृपा करा आणि खोटेनाटे आरोप बंद करा, आता थांबा. नाहीतर आज आमचे नेते अजितदादांबद्दल आज जो तुम्ही मायेचा उन्माळा आणून खोटा आव आणता तो चव्हाट्यावर आणू. तुम्ही जो माझ्याकडे तुमच्या कट कारस्थानांची इत्यंभूत माहिती आहे, असा निर्वाणीचा इशारा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी आ. रोहित पवारांना दिला.

रोहित पवारांच्या आरोपांना सुनील तटकरे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर काय-काय कट कारस्थान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जय पवार आणि पार्थ पवार यांच्या विरोधात आखण्यात आले होते त्याची संपूर्ण माहिती आपल्याकडे असल्याचं म्हणत सुनील तटकरे यांनी रोहित पवारांना इशारा दिला.

सुनील तटकरे यांनी आमदार रोहित पवार यांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. रोहित पवार यांनी सुनील तटतरे आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यावर गंभीर आरोप केले. या दोन्ही नेत्यांना दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधननंतर पक्ष ताब्यात घ्यायचा होता, असा आरोप रोहित पवारांनी केला होता. त्यांच्या या आरोपांना सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन प्रत्युत्तर दिले. अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर काय-काय घडामोडी घडल्या याबाबत आपल्याकडे संपूर्ण माहिती आहे. अजित पवारांच्या अपघातानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांच्या विरोधात काय-काय कट कारस्थान रचले गेले याची संपूर्ण माहिती आपल्याकडे आहे, असं सुनील तटकरे यांनी म्हटलं.

अजित पवार हयात असताना त्यांच्या विरोधात कट कारस्थान झाले, आज तीच कट कारस्थान रचण्याचा प्रयत्न उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार आणि आमच्या पक्षाच्या विरोधात केला जातोय. तो नक्कीच जनता हाणून पाडेल आणि पक्षाचे प्रमुख नेतेही हाणून पाडतील. एवढंच मला त्यांनी जे सांगितलं आहे त्यावर मला भूमिका मांडायची आहे, असं सुनील तटकरे म्हणाले.

### कावीळ झाल्यासारखी वक्तव्ये करण्याचा प्रयत्न

अजितदादांच्या विरोधात मधल्या काळात रोहित पवारांनी संबंध महाराष्ट्राचा फार मोठा दौरा काढला होता. प्रचंड खर्च आणि प्रसिद्धी मिळवून हा दौरा काढला होता. पण आमच्या युवक संघटनेचा जिल्हाध्यक्ष गेला तर अनेक माणसं जमू शकतात इतकी ही माणसे त्यांना जमविता आली नाही. त्यांनी इतका गाजावाजा करत, प्रचंड खर्च करत जो दौरा झाला तो फ्लॉप शो झाला. अनेक बाबतीत झाले, त्यामुळे अस्वस्थ मने आहेत, त्यातून कावीळ झाल्यासारखे वक्तव्ये करण्याचा प्रयत्न होत आहेत, अशी खोचक टीका सुनील तटकरे यांनी केली.

**’मला अनेकदा टार्गेट केलं’**

अजित दादा असतानाही मला अनेकदा टार्गेट केलं गेलं. २०१४ पासून ते वाढत गेलं. पण आम्ही सगळ्यांनी अजित दादांना सावली सारखी साथ दिली. स्वभाविकपणे अजित दादांची उंचावलेली प्रतिमा आणि त्यांच्या महनेतीतून पक्षसंघटनेत पकड मिळवली होती. त्यामध्ये आमचा सहभाग असल्याने आम्हाला टार्गेट करणं स्वभाविक आहे. त्यामुळे मला काही वाटतच नाही. कारण छ्ऊ मध्ये सहभागी होण्याच्या निर्णय घेतला तेव्हा आम्ही अजित दादांच्या सोबत होतो. विलीनीकरणाच्याही बाबतीत त्यांना ते वाटत होतं, असं सुनील तटकरे यांनी स्पष्ट केलं.

**रोहित पवारांना मोठा इशारा**

अजित दादांच्या विमान अपघातानंतर त्यांचे पार्थिव रुग्णालयात आलं, त्यानंतर पोस्टमार्टम झालं, तिथपासून काय-काय घडलंय, या सगळ्यांची माहिती माझ्याकडे आहे. कृपा करा आणि थांबा. नाहीतर मला पुढच्या काही काळात स्पष्ट बाबी सांगाव्या लागतील. तुम्ही सुनेत्रा पवार, पार्थ आणि जय पवार यांच्या विरोधात काय कट कारस्थान करत होता याची आमच्याकडे इत्यंभूत माहिती आहे. थांबा जरा. शेवटी सुसंस्कृत विचारातून आपल्याला वाटचाल करायची आहे, असं म्हणत सुनील तटकरे यांनी रोहित पवारांना इशारा दिला.



## अंतरंग

### अजितदादांच्या मृत्युवर अधिवेशनात चर्चाच नाही

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे बुधवारी सूप वाजले. पाच आठवडे पण प्रत्यक्षात वीस बैठका झाल्या. या काळात १९७ तास ३७ मिनिटे कामकाज झाले. पण माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील मृत्युविषयी चर्चा झाली नाही. विरोधी पक्षांनी अजितदादांच्या मृत्युवर चर्चा घडविण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्यांना यश आले नाही. शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, अजितदादांच्या विमान दुर्घटनेत घातपात किंवा कारस्थान असल्याचे आढळल्यास सरकार आकाश पाताळ एक करीन व यामागे कुणीही असले तरी त्याचा मुडदा खणून काढला जाईल, असे ठणकावून सांगितले.

अजित पवार हे राज्याचे उपमुख्यमंत्री होते, अर्थमंत्री होते. तब्बल अकरा वेळा त्यांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला होता. राष्ट्रवादी काँग्रेस (अप) या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. महायुती सरकारमधील घटक पक्षाचे प्रमुख होते. शरद पवारांचे पुतणे हे नाते तर राज्यात घराघरांत सर्वांना ठाऊक होते. दि. २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती विमानतळावर झालेल्या विमानअपघातात त्यांचा मृत्यू झाल्यानंतर सर्वत्र संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले, त्यांचा मृत्यु हा अपघात की घातपात ? या विमान अपघातामागे दोषी कोण आहे ? ब्लक बॉक्स जळाला की सुरक्षित आहे ? तिथे झाडच नाही मग विमान झाडावर कसे आदळले ? व्हीएसआर विमान कंपनीच्या सेवेबद्दलही अनेकांनी प्रश्न उपस्थित केले. कंपनीचे मालक मोकाट कसे ? इथपासून त्यांच्या मृत्यूमागे कोणी काळी जादू केली आहे काय ? इत्यादी प्रश्नांचा व शंका कुशंकांचा गेले दिड पावणे दोन महिने भडिमार होत आहे. मुख्यमंत्र्यांनी सरकारची भूमिका मांडली, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी निवेदन केले पण या संवेदनशील विषयावर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात चर्चा का झाली नाही ? सरकारची इच्छा नव्हती ?अजितदादांच्या मृत्युच्या घटनेची तीव्रता कमी झाली ? की चर्चेसाठी सरकारवर दबाव आणण्यासाठी विरोधी पक्ष कमी पडला? अजितदादांच्या विमान अपघाती मृत्युला नेमके कोण जबाबदार आहे, असा प्रश्न सरकारला विचारण्याची संधीच विरोधी पक्षाला मिळाली नाही.विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेता नाही. विरोधी पक्षा्च्या बाकांवरून सरकारला कठोर शब्दात जाब विचारणारे कोणी नाही. गेले दिड महिना आमदार रोहित पवार अजितदादांच्या मृत्युची सखोल व पारदर्शक चौकशी व्हावी यासाठी मुंबई -दिल्लीत सर्वत्र वणवण फिरत होते.सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या नेत्यांनाही ते भेटले. ते अजितदादांचे पुतणे असल्याने त्यांची त्यामागे तळमळ आहे हे समजू शकते पण विधिमंडळात अजितदादांचापक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही चर्चेसाठी आग्रह धरला असे दिसले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (अप) हा पक्ष सत्तेत सहभागी आहे. अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री आहेत व त्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. प्रफुल पटेल व सुनिल तटकरे हे दोन्ही नेते मुख्यमंत्र्यांशी थेट बोलू शकतात. तरीही दादांच्या मृत्युवर पाच आठवड्याच्या अधिवेशन काळात सभागृहात चर्चा होऊ नये याचे आश्चर्य वाटते.

रोहित पवार यांनी मुंबईतील मरिन ड्राईव्ह पोलीस स्टेशनवर अजितदादांच्या मृत्युप्रकरणी एफआयआर नोंदव्णियाचा प्रयत्न केला.पण तेथे त्यांनाच नकार देताना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी जी उत्तरे दिली तीचिंताजनक होती.नंतर रोहित यांनी बारामतीला जाऊन तेथे पोलीस स्टेशनवर एफआयआर नोंदविण्याचा प्रयत्न केला तिथेही त्यांना नकार देण्यात आला.अजितदादांच्या मृत्युनंतर महाराष्ट्रात पोलिसांकडे एफआयआर सुध्दा नोंदवला गेलेला नाही. राष्ट्रवादीचे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटले , रोहित पवार यांनीही त्यांची भेट घेतली , अजितदादांच्या मृत्युची चौकशी सीबीआयकडे सोपवावी अशी त्यांनी मागणी केली. पुढे काय झाले, सीबीआय कडे चौकशी सोपविण्यात आली का ? याची कोणतीही माहिती पुढे आलीच नाही. ज्या अजितदादांनी त्यांच्या हयातीत हजारो लोकांना न्याय दिला, सामान्यांना आधार दिला, स्वत:च्यापायावर उभे केले, त्यांच्या आकस्मिक अपघाती मृत्युच्या चौकशीसाठी राजकीय उदासिनता दिसते, हे अतिशय वेदनादायी आहे. महाराष्ट्राची देशात मानहानी व्हावी म्हणून तेथे झिरो एएफआयआर नोंदवला गेला आहे.कर्नाटकात राजकीय सूड बुध्दीने एफआयआर नोंदवला आहे, अशीही टीपणी मुख्यमंत्र्यांनी केली .महाराष्ट्रात तपास नीट चाललेला नाही, हे दाखविण्यासाठी बंगळुरूमधे एफआयआर नोंदविण्यात आला ही बाब मुख्यमंत्र्यांना मुळीच आवडलेली नसावी. सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री आहेत, त्यांचे पुत्र पार्थ राज्यसभा खासदार झालेत. मग महाराष्ट्रात एफआयआर नोंदवायला पोलीस नकार का देतात?जय पवार यांनीही ९ मार्च रोजी आपण पत्रकार परिषद घेणार आहोत असे म्हटले होते. पण कुणाच्या सल्ल्यावरून ती रद्द झाली हेही गुलदस्त्यात आहे.

रोहित पवार यांचे अजितदादा काका आहेत, पण याचा अर्थ त्यांचा कळवळा केवळ तुम्हालाच आहे, असे समजू नका, माझे ते निकटचे मित्र होते, अशा कानपिचक्याही मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी रोहित यांना दिल्या. राष्ट्रवादी काँग्रेस (अप) चे आमदार अमोल मिटकरींनी विधान परिषदेत अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी दादांवर केलेली कविता म्हणून दाखवली- माफ करा दादा आम्हाला, तुम्हाला विसरू शकत नाही, अर्थसंकल्पीय अधिवेशनात, तुम्हाला न्याय देऊ शकलो नाही. भोंदू बाबा अशोक खरातचे शेकडो व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत, पण अजितदादांचा विमान अपघातात मृत्यु होऊन दोन महिने होत आले तरी साधे सीसीटीव्ही फूटेज पुढे येत नाही. अशी खंत त्यांनी बोलून दाखवली.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ चैत्रशके संवत्- १९४७
संवत्सर पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ
मास- फाल्गुन ऋतु- सौर वसंत शुक्ल पक्ष तिथि : जदशमी ०८:४६:००
नक्षत्र : पुष्य १४:४९:५६ योग : सुकर्मा २०:०५:३१
करण:गर ०८:४६:०० करण : वणिज २०:१३:३५
सूर्य:मीन चन्द्र : कर्क हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास -

## राशी भविष्य...

**मेष** — वेळीच केलेले पत्रव्यवहार, आवश्यकतेनुसार केलेले प्रवास फायदेशीर ठरतील. स्वत:च्या मनाने काही निर्णय ठामपणे घेता येतील. व्यवसायिक समस्या दूर होईल.

**वृषभ** — कौटुंबिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठरावा असा एखादा उत्पन्नाचा मार्ग दृष्टीपथात येईल. आरोग्य उत्तम राहील. व्यापारातील हेतु साध्य होण्याकरिता अधिक प्रयत्न करावे लागतील.

**मिथून** — काहीजणांना परदेशी जाण्याच्या संधी मिळतील. काहींच्या आयुष्यामध्ये वैवाहिक जीवनात अचानक काही चांगले प्रसंग येतील. जीवनसाथीच्या प्रगतीमुळे सामाजिक मान सन्मान वाढणार आहे.

**कर्क** — नोकरीनिमित्त होणारे प्रवास पुरेशी काळजी घेऊनच करा. काही कौटुंबिक प्रश्न प्रतिष्ठेचे मुद्दे बनतील. आर्थिक स्थिती चांगली राहिल्याने मन आनंदी राहील. बड्या मंडळीची भेट होण्याचा योग आहे.

**सिंह** — मुलांचे प्रश्न वेळचेवेळी सोडविल्यास उज्वल यशापासून वंचित राहणार नाही. घरातील काही महत्त्वाचे प्रश्न आपण पुढाकार घेऊन मिटवावे. समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तिंच्या भेटी होतील.

**कन्या** — आर्थिक देवघेव, निष्कारण मोठेपण टिकविण्यासाठी केलेला खर्च यात व्यावहारिक गोष्टीकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका. व्यवहार कुशलतेमुळे अधिकारी खुष राहतील. आर्थिक उत्पन्न वाढणार आहे.

**तूळ** — तब्येतीची पाळलेली पथ्ये तसेच बोलण्यातून किंवा कृतीतून आपला तोल ढळू न दिल्यास प्रगतीचा एखादा मोठा टप्पा गाठता येईल. अचानक धनप्राप्ती होण्याचा योग आहे.

**वृश्चिक** — व्यवसायाचे नवे अंदाज अचूक ठरतील. काही गुंतवणूक फायदेशीर ठरेल. बाहेरचे वातावरण अनुकूल राहील. मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. आखलेल्या योजना पूर्ण होणार नाही.

**धनू** — नोकरी व्यवसायाचे ठिकाणी अनिष्ट प्रवृत्तीचा ताप मन:स्तापदायक ठरेल. अशांच्या कारवाया अहितकारक ठरतील. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मकर** — बौध्दिक क्षेत्रातील प्रगती उपवधुसाठी अपेक्षित स्थळ नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना पुरेशा संधी अशा काही प्रसंगातून प्रचिती यावी. कौटुंबिक सुख व पत्नीच्या सहयोगाने मन प्रसन्न राहील.

**कुंभ** — नोकरी-व्यवसायात भांडण होणे सध्या तरी परवडणारे नाही. मुलांच्या विचित्र वागण्यामुळे आपणास त्रागा करावा लागेल. व्यावसायीक वाद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येईल. अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील.

**मीन** — नोकरीच्या ठिकाणी आपण भले आणि आपले काम भले असे धोरण ठेवा. प्रयत्न व दूरदर्शिपणा यामुळे आपल्याला इतरांकडून समर्थन मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.



## पारावरचा फड

एकीकडे भोंदू अशोक खरात यांच्या भानगडीतून सत्ताधारी अन् विरोधक राजकारण्यांचे लागेबांधे आणि त्यातून संशयकल्लोळ सुरू आहे. त्यात नव्यानं मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कथित रासलीलांचे काहुर सुरू झाले आहे. सोशल मिडियातून त्यांच्या तृतीयपंथीयांसोबतच्या वादग्रस्त फोटो आणि व्हिडिओ व्हायरलचा अवडंबर माजला आहे. त्यामुळे त्यांच्याही मागे राजिनामासत्राचा एकीकडून पिच्छा सुरू झाला आहे तर दुसरीकडून विरोधकांतीलच काहीजण त्यांना टार्गेट करून बदनाम केल्याचे सांगत पाठराखण होऊ लागलीय. वास्तविक राष्ट्रवादीचे नेते अजीतदादांच्या हयातीतच राष्ट्रवादीतील अनेक मंत्र्यांच्या वादग्रस्त विधान अन् कारभारावरून राजिनाम्याची नाचक्की आली होती. आता त्यांच्या पश्चात ठोस पाठराखण करायला कुणी नाही. त्यात राष्ट्रवादीच्या नेत्यांचेच अधिक प्रकार चव्हाट्यावर येऊ लागल्याने त्यांच्यावर कुणाचा कंट्रोल, शिवाय जनात बदनामीची चाड आहे की नाही, याबाबत पारावरची चर्चा...!

**पांडूनाना :** आरं त्या भोंदू अशोक खरातबाबाचं समद्याच पक्शाच्या नेत्यांचं लागंबांदं आसल्याचसं समुर आलं तरी त्यात त्या चाकनकरताई आन् ते तटकरेंचं बोटांच्या जकमाचं लई गाजतंया.

**बाबूराव :** व्हय, त्यात चाकनकरबाईचा बळी गेला. आता आनी कुना-कुनाचं काय हुतंया कुनास ठावं?

**पांडूनाना :** कुटलं काय आन् फाटक्यात पाय आता ते ईजलं जवळजवळ. आता त्या खरातचाच फास आवळतुया वाटतं.

**बाबूराव :** ते कमी हुतं म्हनू का काय आता त्या मंतरी झिरवळांची काय त्या बाई-बाप्याचं भानगड आता गाजाय लागलीया.

**पांडूनाना** : त्ये तर म्हंत्यात मिक्शिंग करुन मला बदनाम करत्यात. आन् दुसरीकडं इरोदक बी त्येंना सत्ताधाऱ्यांकडनं आडकवायचं चाललंय म्हंत्यात.

**बाबूराव** : काय सांगता येत न्हाय? आरं ते एआय आलंया काय काय करत्याल सांगता येत न्हाय.

**पांडूनाना** : पर म्या म्हंतु कुटं तर आग लागल्याशिवाय धूर निगंल काय?

**बाबूराव** : म्हजी?

**पांडूनाना** : राष्ट्रवादीच्याच नेत्यांच्याच भानगडी आन् वाद का हुतुंया. त्ये धनुभाऊ मुंडे, माणिकराव कोकाटे, आता चाकनकर बाई आन् झिरवाळ...

**बाबूराव** : काय कळायचंच बंद हुतंया.


**पांडूनाना** : म्या म्हंतू, आपन समाजशेवक हाय म्हटल्यावं आपली इमेज जपली पायजे का न्हाय?

**बाबूराव** : आता सापडल त्यो चोर. राजकारनात कुनी कसा वागतुया हे काय सांगता येतंया का?

**पांडूनाना** : राजकारनाची पातळी लईच घसरलीया बग.

**बाबूराव** : ते मातुर खराय...! - **अमृत चौगुले**

## उपदेश कथा



**शहाणपण**

उन्हाळ्याचे दिवस होते. जमीन खूप तापून पाण्याचे प्रवाह सुकून गेले होते. अशावेळी एक सिंह आणि एक रानबोकड असे एकाच झऱ्यावर पाणी पिण्याकरिता आले. एकमेकांना समोर पाहताच आधी कोणी पाणी प्यायचे, यावरून त्यांचे भांडण जुंपले. जोराने लट्ठालट्ठी करण्याच्या पवित्र्यात ते उभे असताना सहज त्यांचे वर लक्ष गेले. डोक्यावर अनेक गिधाडे घिरट्या घालत होती. त्या दोघांपैकी जो मरेल त्याचा फज्जा उडवायला ती अगदी उत्सुक होती. ते पाहून त्या दोघांनी एकमेकांकडे पाहिले आणि म्हणाले, मित्रा माझी इच्छा आहे की तूच त्याचे प्रथम पाणी प्यावेस.

**कथा उपदेश : चुरशीच्या भांडणात तिसऱ्याचाच लाभ होण्याची शक्यता असते तेव्हा एकाने कुणीतरी माघार घेणेच योग्य.**

## दिनविशेष...



**आंतरराष्ट्रीय**

१८९५ - फ्रेंच संशोधक ल्युझिमर बंधूंनी 'लंच ऍट द ल्युझिमर फॅक्टरी' नावाचा चलचित्रपट तयार केला. केवळ तीस सेकंदाची लांबी असलेला हा चित्रपट आधुनिक चित्रपटसृष्टीची सुरुवात मानली जाते.

१९१० - पाण्यात उतरू शकणारे आणि पाण्यातील उडू शकणारे पहिले ‘सी प्लेन’ हेन्री बर यांनी बनवले.

१९१७ - ब्रिटीश सैन्यात मियांसाठी वुमेन्स आर्मी ऑक्झिलरी युनिटची स्थापना.

१९३० - कॉन्स्टँटिनोपलचे नाव बदलून इस्तंबूल करण्यात आले.

१९४२ - टोकियोमध्ये इंडिया इंडिपेंडंट लीगची स्थापना. वसबिहारी बोस अध्यक्ष.

१९४४ - इंग्लंडमध्ये शिक्षकी पेशात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने पगार देण्यास मान्यता.

२००८ - उगांडाची राजधानी कंपालाच्या पश्चिमेकडील किंगो भागात एक बस पलटल्याने ४ मुलांसह ४० जणांचा मृत्यू झाला.

**राष्ट्रीय**

१९४८ - हैद्राबादमधील हजार महिलांनी निझामशाहीतील परिस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी उपोषण सुरू केले.

१९५७ - केरळमधील आणि भारतातील पहिले बिगरकाँग्रेसी राज्य सरकार सत्तेवर.

१९९२ - भारतीय उद्योगाचे अध्वर्यू जे. आर. डी. टाटा यांना भारतरत्न हा सर्वोच्च भारतीय सन्मान तत्कालीन राष्ट्रपती आर. व्यंकटरमण यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

१९९८ - सी-डॅक ने पूर्णपणे स्वदेशी बनावटीचा परम १०००० हा महासंगणक देशाला अर्पण केला.

## युध्दामुळे तेलटंचाई...!

सध्या जवळपास गेले २७ दिवस इराण - अमेरिकी इस्त्रायल या देशांचे युद्ध सुरु आहे . अनेक देशांनी यामुळे इंधनाचे दर वाढविले आहेत यामध्ये अमेरिका, पाकिस्तान, जर्मनी, द कोरिया, ब्रिटन, श्रीलंका, जपान मलेशिया आदी देशांचा समावेश आहे पाकिस्तानमध्ये शाळा, कॉलेज दोन आठवडे बंद आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी चार दिवसांचा आठवडा आहे. सरकारी विभागाचा इंधन पुरवठा तब्बल ५0 टक्क्यांनी कमी झाला आहे . श्रीलंकेने बुधवारी विद्यापीठे व शाळा यांना व सरकारी कर्मचाऱ्यांना सुट्टी जाहीर केला आहे . खाजगी वाहनासाठी पेट्रोल मर्यादा १५ लिटर तर सार्वजनिक वाहतुकीसाठी २00 लिटर केली आहे . बांगला देशाने अनेक ठिकाणी ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय निवडला आहे. घरे व उधोगासाठी सुमारे पाच तासांची वीज कपात केली आहे . खुद्द अमेरिकेने सुध्दा २४. १ टक्के एवढी भाववाढ केली आहे .शेजारील भुतानने सुध्दा १.५ टक्के भाववाढ तेलामध्ये केली आहे . सर्वात जास्त वाढ ऑस्ट्रेलिया देशाने तब्बल ३२.४ टक्के एवढी केली आहे एकूणच जगातील सर्वच देशांनी तेलाची भाववाढ केली आहे. याला अपवाद आहे भारत ! भारताने तेलाची भाववाढ केलेली नाही. यामुळे साऱ्या भारत वासियांना दिलासा मिळालेला आहे. आता आजच इराणने होर्मुक समुदधुनी भारत, चीन, रशिया पाकिस्तान इराक आदी काही मोजक्याच देशांना खुली केली आहे.

**-शांताराम वाघ, पुणे**

## जन की बात...



### घटस्फोटांचे वाढते प्रमाण चिंताजनक !

विवाह पृथ्वीतलावर होत असले, तरी जोडीदाराच्या गाठी या स्वर्गातच बांधल्या जातात अशी समजूत भारतीयांत पूर्वापार चालत आली आहे. त्यामुळे घटस्फोट हा शब्द भारतीय शब्दकोशात कुठेही सापडत नाही. विवाह संस्काराच्या माध्यमातून सात जन्माची गाठ बांधली जाते, या संस्कारात देवाब्राह्मणांच्या साक्षीने जन्मभर एकमेकांशी प्रामाणिक राहण्याचे, एकमेकांची काळजी घेण्याचे वचन दिले आणि घेतले जाते. या पवित्र संस्काराने ब झालेले उभयता आयुष्यात येणाऱ्या सुखदु:खाच्या प्रसंगांना नेटाने सामोरे जातात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर एकमेकांना साथ देत संसाराचे गाडे हाकतात.

गेल्या काही वर्षांत भारतीय तरुणांवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. भारतात वाढत जाणारे घटस्फोटांचे प्रमाणही याचीच फलश्रुती आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेनुसार भारतात साधारणतः २० वर्षांपूर्वी ०.६% विवाहित महिला घटस्फोटित किंवा विभक्त होत्या, आता हे प्रमाण १% झाले आहे. पुणे स्टडी १९८६-८७ नुसार, घटस्फोटाच्या प्रकरणांपैकी ६७ टक्के खटले पतींनी दाखल केले होते नवीन आकडेवारीनुसार घटस्फोट घेण्यासाठी खटले दाखल करणाऱ्यांमध्ये ५८% महिला आहेत. मुंबई फॅमिली कोर्टाच्या एका अभ्यासानुसार, ४०% प्रकरणांत लग्नानंतर ३ वर्षांतच संबंध दुरावतात. घटस्फोट मागणाऱ्या महिला बऱ्याचदा २५ ते ३४ वयोगटातील असतात. दरवर्षी घटस्फोटांची जेवढी प्रकरणे न्यायालयात निकाली काढली जातात, तेव्हढीच किंबहुना त्याहून अधिक नवीन प्रकरणे न्यायालयांत नव्याने प्रविष्ट केली जातात. त्यामुळे येणाऱ्या काळात देशाची कुटुंबव्यवस्था संकटात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

शहरासारख्या ठिकाणी राहणाऱ्या जोडप्यांमध्ये ग्रामीण भागाच्या तुलनेत घटस्फोटांचे प्रमाण अधिक आहे. शहरी भागात राहणारे बहुतांश तरूण पती पत्नी दोघेही नोकरी किंवा व्यवसाय करणारे आणि बऱ्यापैकी धन कमावणारे असतात. कार्यालयात उच्च पदावर असताना इतरांकडून मिळणारा मानसन्मान, सुधारित राहणीमान यामुळे राहणीमानाचा आणि पदाचा काही प्रमाणात अहंकार निर्माण होऊ लागतो. घरी जोडीदाराकडूनही अशाच सन्मानाची अपेक्षा केली जाते. आवश्यक तिथे तडजोड करणे, माघार घेणे, परस्परांमध्ये विसाचे नाते निर्माण करणे या गोष्टी प्राथमिक टप्प्यावर अत्यंत आवश्यक असतात.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

## इंक्रेडिबल प्रीमियम लीग

जगातील सर्वाधिक महागडी आणि लोकप्रिय लीग म्हणून ओळखली जाणारी इंडीयन प्रीमियम लीग अर्थात आयपीएलच्या एकोणिसाव्या हंगामाची सुरुवात आजपासून म्हणजे २८ मार्च पासून होणार असून पुढील दोन महिने आयपीएलचा थरार चालू राहणार असल्याने क्रिकेट प्रेमींसाठी ती मोठी मेजवानी ठरणार आहे. आयपीएलची सुरुवात २००८ साली झाली. म्हणजे आज आयपीएलला अठरा वर्ष पूर्ण झाली. या अठरा वर्षात क्रिकेटच्या मैदानात आणि मैदानाच्या बाहेर अनेक घडामोडी घडल्या पण आयपीएलची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही. आयपीएललाही मॅच फिक्सिंग सारखी किड लागली होती. मॅच फिक्सिंगचा आरोप झाल्याने काही खेळाडूंना कायमचे घरी बसवण्यात आले तर चेन्नई आणि राजस्थान या सारख्या लोकप्रिय संघावर दोन वर्षाची बंदी घालण्यात आली होती. मॅच फिक्सिंग मुळे आयपीएलला उतरती कळा लागेल असा अंदाज बांधला जात होता मात्र तो फोल ठरला उलट आयपीएल आणखी लोकप्रिय ठरली. कोरोनाचा फटका जसा इतर क्रीडा प्रकारांना बसला तसाच तो आयपीएललाही बसला. कोरोनाच्या सावटातही बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन केले. कधी देशात तर कधी परदेशात, कधी प्रेक्षकांशिवाय तर प्रेक्षकांसह आयपीएलचे आयोजन करून बीसीसीआयने क्रिकेट प्रेमींना आयपीएलचा थरार अनुभवण्याची संधी दिली.

**-आकांक्षा पाटील, सांगली**

# कानगाव येथील जमिनीच्या फेरफारमध्ये मोठा घोळ

## एकाच फेरफार नोंदीवर दोन वेगवेगळ्या तारखा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**दौंड :** राज्य शासनाने महसूल विभागातील भ्रष्टाचार आणि सातबारा फेरफारमधील गैरप्रकारांविरोधात १५ अधिकाऱ्यांवर सक्तीच्या रजेची कारवाई केल्यानंतर आता दौंड तालुक्यातील कानगाव येथील एक खळबळजनक प्रकरण समोर आले आहे. मौजे कानगाव येथील गट नं. ६७१/ब मधील फेरफार क्र. ८७३६ च्या प्रमाणीकरणामध्ये चक्क दोन वेगवेगळ्या तारखा दिसून येत असून, यात प्रशासकीय नियमांची पायमल्ली झाल्याचा आरोप होत आहे.

> ''एकाच फेरफार क्रमांकावर दोन वेगवेगळ्या तारखा असणे ही गंभीर बाब आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी महसूल कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई व्हावी, हीच मागणी आहे.''
> – वसंत साळुंखे (प्रदेश उपाध्यक्ष, जय शिवसंग्राम संघटना)

मिळालेल्या माहितीनुसार, सुशील सारडा यांनी श्री सिमेंट लिमिटेड यांना विक्री केलेल्या जमिनीच्या फेरफार नोंदीबाबत (क्र. ८७३६) गंभीर विसंगती आढळली आहे. या फेरफारची नोंद तत्कालीन मंडल अधिकाऱ्यांनी ०२/११/२०१९ रोजी प्रमाणित केल्याचे एका ठिकाणी दिसते, तर शासकीय वेबसाईटवर याच फेरफारची प्रमाणीकरण तारीख २०/०३/२०२० अशी दर्शवली जात आहे. एकाच शासकीय दस्तऐवजावर दोन भिन्न तारखा असणे, हा गंभीर प्रकार असून यात 'बॅकडेटेड' नोंदी किंवा अभिलेख फेरफार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तहसीलदार, दौंड यांनी जिल्हाधिकारी (कुळकायदा शाखा) पुणे यांच्याकडे मार्गदर्शन मागवले आहे. अर्जासोबत जोडलेले ७/१२ आणि फेरफार उतारे पाहता, दोन तारखांमध्ये असणारी तफावत स्पष्टपणे दिसून येत आहे. या प्रकरणात वसंत साळुंके यांनी तक्रार दाखल केली असून, प्रशासकीय यंत्रणेकडून यावर तातडीने स्पष्टीकरण मागवले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच १५ महसूल अधिकाऱ्यांवर कारवाई करून भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर पावले उचलण्याचे संकेत दिले आहेत. याच पार्श्वभूमीवर आता कानगाव येथील या प्रकरणाची चौकशी झाल्यास मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नियम डावलून फेरफार मंजूर करण्यापूर्वीच ७/१२ उताऱ्याची प्रत संबंधित खरेदीदारास दिली गेली का? आणि महसूल अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करून अनधिकृतपणे ही प्रक्रिया राबवली गेली का? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. जमीन व्यवहारांमधील पारदर्शकता टिकवण्यासाठी फेरफार प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असते.

मात्र, अशा प्रकारे तारखांमध्ये फेरफार करून जर सातबारा बदलले जात असतील, तर सामान्य जनतेचा महसूल प्रशासनावरील विश्वास डळमळीत होऊ शकतो. आता जिल्हाधिकारी यावर काय भूमिका घेतात आणि या 'डबल डेट' फेरफार प्रकरणातील सूत्रधारांवर कोणती कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जुन्नर-आंबेगाव उपविभागीय अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहात अटक; एसीबीची कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

**निरगुडसर :** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) पुणे यांच्याकडून मोठी कारवाई करत जुन्नर-आंबेगाव येथील उपविभागीय अधिकारी गोविंद पंढरीनाथ शिंदे (वय ४६) यांना २ लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक करण्यात आली.



मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे बांधकाम व्यावसायिक असून त्यांच्या इमारतीच्या पूर्णत्व प्रमाणपत्रासंदर्भात कामासाठी उपविभागीय कार्यालयाशी संपर्क साधला होता. संबंधित काम मंजूर करून देण्यासाठी आरोपी अधिकाऱ्याने सुरुवातीला ५ लाख रुपयांची लाच मागितली होती. नंतर पडताळणीदरम्यान ही रक्कम २ लाख रुपयांवर ठरविण्यात आली. तक्रारदाराने याबाबत २४ मार्च २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दाखल केली. त्यानुसार एसीबीने पडताळणी करून सापळा रचला. दि. २७ मार्च २०२६ रोजी मंचर येथील उपविभागीय कार्यालयात आरोपी गोविंद शिंदे यांनी तक्रारदाराकडून २ लाख रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले. ही कारवाई पोलिस निरीक्षक प्रसाद लोणारे आणि पोलिस निरीक्षक प्रवीण निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. आरोपीविरुद्ध मंचर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, एसीबीने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी शासकीय कामासाठी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाच मागत असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

# स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया जुन्नर तालुका समितीचे अधिवेशन संपन्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया जुन्नर तालुका समितीचे २२ वे तालुका अधिवेशन २५ मार्च २०२६ रोजी जुन्नर शहरात पार पडले या अधिवेशनाने १७ सदस्यांची तालुका समिती निवड केली यामध्ये ७ सदस्यांचे सचिव मंडळ निवडण्यात आले आहे.

उद्घाटन सत्र, प्रतिनिधी सत्र, समिती निवड अशा तीन टप्प्यात अधिवेशन पार पडले.

यावेळी उद्घाटक म्हणून एसएफआय पुणे जिल्ह्याचे माजी कार्यकर्ते गणपत घोडे यांनी 'आजची शैक्षणिक, सामाजिक परिस्थिती आणि विद्यार्थी चळवळीची भूमिका' या विषयावरती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर राष्ट्रीय आदिवासी अधिकारी मंचाचे नेते प्रा.संजय साबळे, राज्य उपाध्यक्ष नवनाथ मोरे यांनी मार्गदर्शन करत अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या. जिल्हा सहसचिव समीर गारे यांनी निरीक्षण मांडले आणि अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या .




या अधिवेशनात वार्षिक अहवालाचे वाचन करून संघटनेच्या कमजोऱ्या आणि संघटनेचे बलस्थाने यावर विचारमंथन करून पुढील वर्षभरात संघटनेची दिशा व लढा काय असावा ? यावर ठराव मांडण्यात आले.

सरकारी शाळा बळकट करण्यासाठी दत्तक शाळा योजना व समूह शाळांच्या विरोधातील लढा तीव्र करा, महिलांवरील अत्याचाराविरोधी लढा तीव्र करा, शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना ''शून्य शुल्क प्रवेश'' योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी लढा तीव्र करा, वसतिगृह आणि आश्रमशाळांच्या प्रश्नाविषयी लढा तीव्र करा. हे ठराव सभागृहात मांडून यावर एकमताने मान्यता घेण्यात आली .

त्यानंतर नवीन समितीचा प्रस्ताव अधिवेशनात मांडून त्यावर एकमताने मान्यता घेण्यात येऊन तालुक्याची पुढील तालुका समिती नेमण्यात आली . त्यानंतर नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष सुरज बांबळे, सचिव स्वामी गवारी यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्ष प्रज्वल करवंदे, कोषाध्यक्ष साहिल जोशी, सहसचिव विनायक इरणक, कायम निमंत्रित सचिव मंडळ सदस्य श्वेता शेखरे, ऋषिकेश कचरे व सदस्य साहिल कोरडे, निलेश मोरे, अक्षय लोहकरे, अक्षदा पोफळे, वैशाली डामसे, आरती इरणक, दीपिका गवारी यांची तालुका समितीचे पदाधिकारी म्हणून एकमताने निवड करण्यात आली.

## श्रीराम मंदिर पांधारा येथे रामनवमी उत्साहात साजरी



■ जनप्रवास प्रतिनिधी

**इंदापूर :** श्रीराम नवमीच्या निमित्ताने श्रीराम मंदिर पांधारा येथे कीर्तन पार पडले.

किर्तन ऐकण्यास भाविक भक्तांची गर्दी जमली होती. श्रीराम मंदिर पांधारा येथे रामनवमी निमित्त श्रीराम जन्मोत्सव मंदिराचे प्रमुख दीपक बडवे यांच्या अध्यक्षतेखाली श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. श्रीराम जन्म कथा लता देशपांडे यांच्या कथानकांतून झाले. श्री रामाचा पाळणा गीत झाले पुष्पवृष्टी दुपारी बारा झाली. या जन्मोत्सवा वेळी रामरक्षा जपमाळ याचे श्रवण झाले. मंदिरामध्ये चैत्र पाडवा ते नववीपर्यंत नवरात्र उत्सव कार्यक्रम पार पडला. या जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाला महिलांची आणि पुरुषांची प्रचंड गर्दी झाली होती. जन्मोत्सव झाल्यानंतर सर्व भावीक भक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

प्रभू श्रीराम जन्मोत्सव कार्यक्रमासाठी बडवे परिवार, गंगाराम बनसोडे परिवार, महादेव चव्हाण परिवार, सामाजिक कार्यकर्ते हमीद भाई आतार भारत बोराटे सर,हनुमंत बोंगाणे प्राध्यापक कृष्णा ताटे या सर्वांचे सहकार्य लाभले..

## सिद्धेश्वर निंबोडी गावची यात्रा साध्या पद्धतीने होणार : सरपंच संतोष सोनवणे

■ जनप्रवास प्रतिनिधी

**भिगवण :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दु:खद निधनामुळे निंबोडी येथील सिद्धेश्वर यात्रा उत्सव यंदा अत्यंत साध्या पद्धतीने पार पाडण्याचा निर्णय सिद्धेश्वर यात्रा कमिटी यांनी घेतला आहे.



निंबोडी येथे परंपरेनुसार मारुती मंदिरात गुढीपाडव्याच्या दिवशी यात्रा कमिटीची बैठक घेऊन वर्गणी पुस्तक पूजन करून उत्सवाची तयारी सुरू केली जाते. मात्र राज्याचे दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या दु:खद निधनामुळे यंदा सर्व ग्रामस्थांनी एकमताने उत्सवातील जल्लोष टाळला व त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याचा निर्णय घेतला आहे.

यंदाच्या उत्सवात कोणत्याही प्रकारचा मोठा कार्यक्रम सांस्कृतिक सोहळा किंवा जल्लोष न करता धार्मिक विधी अत्यंत साधेपणाने पार पाडण्यात येणार आहे. यामध्ये देवाचा अभिषेक, तसेच पालखी मिरवणूक हे विधी पारंपारिक पद्धतीने होतील मात्र मिरवणुकी दरम्यान गुलालाची उधळण टाळण्यात येणार असून फक्त ढोल वादक व लेझीम शांततेत कार्यक्रम पार पाडला जाणार आहे. सिद्धेश्वर यात्रा कमिटीच्या वतीने सांगण्यात आले की सध्याची शोक पूर्ण वातावरणाचा आदर राखत हा निर्णय घेण्यात आला आहे. गावातील सर्व नागरिकांनी या निर्णयाला सहमती दर्शवले असून उत्सव साध्या स्वरूपात साजरा करण्यास पाठिंबा दिला आहे. श्री सिद्धेश्वर यात्रा उत्सव साजरा होणार असून ग्रामस्थांमध्ये श्रद्धा व परंपरा जपत संयमित वातावरणात धार्मिक कार्यक्रम साधेपणाने पार पाडण्याचा निर्णय सरपंच संतोष सोनवणे यांनी व्यक्त केला आहे.

## स्व.रसिकलाल धारिवाल यांच्या जयंतीनिमित्त महारक्तदान शिबिराचे आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिरूर :** जागतिक कीर्तीचे प्रसिद्ध दानशूर उद्योजक आणि शिरुरचे मा.नगराध्यक्ष स्व.रसिकलाल धारिवाल यांच्या ८७ व्या जयंती निमित्त शिरुरमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन पी.आर.धारिवाल फाऊंडेशन व प्रकाशभाऊ धारिवाल मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



स्व.रसिकलाल धारिवाल यांचा शिरुर शहराच्या योगदानात मोलाचा वाटा होता.अनेक धार्मिक,वैद्यकीय तसेच शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले होते. गत वर्षी रक्तदान शिबिरात १५०० पेक्षा जास्त रक्तदात्यांनी सहयोग नोंदवून विक्रमी टप्पा पार केला होता. शिरुर मंगल कार्यालय येथे उद्या रविवार दि.२९ मार्च २०२६ रोजी सकाळी सात ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत या वेळेत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे असे आयोजकांनी सांगितले आहे.

तसेच सामाजिक भावनेतून सर्व रक्तदात्यामधून लकीड्रॉ पद्धतीने ८७ रक्तदात्यांना सायकल वाटप करण्यात येणार आहे असे आयोजकांनी सांगितले आहे.त्यामुळे जास्तीत जास्त रक्तदात्यांनी या शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## डोणजे येथे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

### स्त्रीशक्ती पुरस्काराने गौरव; विविध क्षेत्रातील महिलांच्या कार्याचा गौरवपूर्ण सोहळा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**डोणजे :** सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या डोणजे येथे दिव्यांग विकास संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महिलांना 'स्त्रीशक्ती पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.




समाज, शिक्षण, आरोग्य, प्रशासन व व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. संगणक तज्ज्ञ सुप्रिया यादव, लेखाधिकारी नयना कुंभार, डॉ. श्रेया भरेकर, प्राध्यापक सारिका पवार, डोणजे येथील आशा सेविका व अंगणवाडी सेविका, सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा पायगुडे, डॉ. आसावरी भरेकर, सी.ए. भाग्यश्री चव्हाण तसेच आदिवासी समाजातील सामाजिक कार्यकर्त्या मीरा वाघमारे यांच्यासह समाजातील कष्टकरी महिलांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला नगरसेवक हरिदास चरवड, पंचायत समिती सदस्या शुभांगी खिरीड, डोणजेच्या सरपंच स्नेहल वाल्हेकर, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे माजी सदस्य बाळासाहेब पारगे, इतिहास अभ्यासक दत्तात्रय नलावडे, आरोग्य अधिकारी विजय मते यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच माजी सरपंच ताराबाई नानगुडे, मोगरवाडी सरपंच संतोषी दारवटकर, पुणे विद्यापीठाचे आरोग्य अधिकारी माधव चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते अनिल नानगुडे, तानाजी मगर, किरण खिरीड, सुवर्णा खिरीड, संगीता जगताप, चंद्रकांत कुंभार, दत्ता कुंभार, शंभू सूर्यवंशी, पोलिस पाटील दिलीप पायगुडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन दिव्यांग विकास संस्थेचे अध्यक्ष बाजीराव पारगे, नीलेश जागडे, शिवराम बिराजदार तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (मुंबई) डिजिटल मीडिया पुणे जिल्हा सचिव सागर माने यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे कौतुक केले.

# समानता सामाजिक विचारांची हे पुस्तक प्रकाशित

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** सलील जव्हेरी यांनी लिहिलेल्या व अनुराधा पब्लिकेशन निर्मित समानता सामाजिक विचारांची या पुस्तकाचे प्रकाशन आज भारत इतिहास संशोधक मंडळ येथे करण्यात आले.

या वेळी यशदाचे अतिरिक्त जिल्हाधिकारी राजीव नंदकर ,ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य श्याम भुर्के,निवृत्त सहाय्यक पोलीस,महाराष्ट्र पोलीस श्रीमती स्मिता पाठक, लेखक सलील जव्हेरी,अनुराधा पब्लिकेशनच्या चेतना नंदकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते




कार्यक्रमाची सुरवात गीता भुर्के यांनी गायलेल्या ईशस्तवनाने झाली.

लेखकाचे मनोगत व्यक्त करतांना सलील जव्हेरी म्हणालेरीतीरिवाज आणि पारंपरिक मानसिकतेमुळे महिलांची भूमिका अनेकदा चूल आणि मुलांपुरती मर्यादित राहिली. मात्र, महिलांमध्ये असलेली अपार क्षमता ओळखून त्यांना स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देणे आणि स्त्री-पुरुष दोघांकडूनही १०० टक्के योगदान मिळवणे हे या पुस्तकाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.मला आयुष्यात भेटलेल्या अनेक व्यक्तींच्या अनुभव, विचार आणि निस्वार्थ प्रेरणेतून हे पुस्तक साकारले आहे.

श्याम भुर्के म्हणाले समानता सामाजिक विचारांची हे पुस्तक सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि संकटांना संधी म्हणून पाहण्याचा संदेश देणारे आहे. समाजकार्याच्या अनुभवातून लेखकांनी समाजातील समस्या समजून त्यावर मार्गदर्शन केले आहे. पुस्तकात स्त्रीसन्मान, एकत्र कुटुंब पद्धती आणि एकमेका सहाय्य करू या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे.तसेच समुपदेशनाचे महत्त्व स्पष्ट करत विविध घटकांसाठी उपयुक्त मार्गदर्शन दिले आहे.समाजातील विषमता कमी करून माणुसकी आणि जागृती वाढविणारे हे पुस्तक प्रेरणादायी आहे .

## नारायणगाव येथील मुक्ताबाई समाज मंदिरामध्ये लवकरच मोफत डायलेसिस सुविधा उपलब्ध होणार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**नारायणगाव :** नारायणगाव (ता. जुन्नर) येथील मुक्ताबाई समाज मंदिर कार्यालयामध्ये लवकरच मोफत डायलेसिस सुविधा सुरू होत आहे,



रामनवमीच्या शुभमुहूर्तावर पाच डायलेसिस मशीन येथे दाखल झाल्या असून, सध्या डायलेसिस सेंटरचे काम वेगाने प्रगतीपथावर सुरू आहे.

डायलेसिस उपचार हा अनेक रुग्णांसाठी अत्यंत महागडा ठरतो. अशा परिस्थितीत ही सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध होणार असल्यामुळे गोरगरिब रुग्णांना मोठा आधार मिळणार आहे.

ही केवळ एक सुविधा नसून, अनेक कुटुंबांसाठी नव्या आशेचा किरण आहे.

अशी माहिती प्रथम लोकनियुक्त सरपंच योगेश उर्फ बाबू पाटे यांनी दिली. येणाऱ्या काळात सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी अशाच विविध योजना राबवण्याचा निर्धार असून, समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत मदत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल. असे उद्गार उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे यांनी काढले असून मी जनतेच्या सेवेसाठी सदैव कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

## संक्षीप्त वृत्त

### बालक आणि महिलांच्या संरक्षणासाठी स्नेहालयचा संयुक्त उपक्रम; शिक्षण, आरोग्य आणि विकासासाठी २८ मार्चला विशेष जनजागृती कार्यक्रम

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहमदनगर :** आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत बालकांचे संरक्षण, महिलांची सुरक्षितता आणि सर्वांसाठी शिक्षणाचा अधिकार अधिक महत्त्वाचा ठरत आहे. अजूनही अनेक मुलं शिक्षणापासून वंचित राहतात, बालविवाह, बालहक्कांचे उल्लंघन आणि महिलांवरील अन्याय यांसारख्या समस्या समाजात दिसून येतात. अशा परिस्थितीत प्रत्येक बालकाला सुरक्षित बालपण, शिक्षणाची संधी आणि महिलांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळणे ही काळाची गरज बनली आहे. समाजाचा खरा विकास हा बालक आणि महिलांच्या संरक्षणातूनच शक्य आहे, या उद्देशाने स्नेहालय संस्थेच्या विविध प्रकल्पांच्या संयुक्त विद्यमाने विशेष जनजागृती व सेवा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

बालक आणि महिला यांचे संरक्षण, शिक्षण, आरोग्य आणि योजनांच्या संधींचा संगम या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम शनिवार, दि. २८ मार्च २०२६ रोजी मनपा प्राथमिक शाळा, गांधीनगर (लिंगेश्वर मंदिरासमोर, बोल्हेगाव) येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत पार पडणार आहे. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नवीन प्रवेश सर्वेक्षण आणि शाळेत प्रवेशाबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

### फ्लिपकार्ट च्या अभ्यासानुसार महाराष्ट्रातील ५४ टक्के डिलिव्हरी पार्टनर्स ईव्हीच्या वापरासाठी उत्सुक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** फ्लिपकार्ट इंडिया या भारतातील होमग्रोन ई कॉमर्स बाजारपेठे तर्फे आज ' दि लास्ट माईल लीप: एम्पॉवरींग डिलिव्हरी फ्लीट्स टू ॲक्सलरेट इंडियाज इलेक्ट्रिक मोबिलिटी ट्रान्झिशन' या श्वेतपत्रिकेचे अनावरण केले, ही श्वेतपत्रिका म्हणजे संपूर्ण भारतातील ६००० हून अधिक विशमास्टर्स (डिलिव्हरी पार्टनर्स) चे केलेले सर्वेक्षण आहे. या अभ्यासातून असे दिसून आले की महाराष्ट्रातील डिलिव्हरी पार्टनर्स हे इलेक्ट्रिक वाहने चालवण्यास उत्सुक आहेत, फ्लिपकार्ट रिसर्चच्या सर्वेक्षणानुसार, सर्वेक्षण करण्यात आलेल्या पार्टनर्स पैकी ५४ टक्के लोकांनी ईव्हीचा वापर करण्यास उत्सुकता दर्शवली आहे. यातून हे अधोरेखित होते की हे राज्य इव्ही वाहतूकीसाठी उत्सूक असलेले राज्य बनले आहे.

अभ्यासाअंती असे दिसून येते की डिलिव्हरी पार्टनर्स मध्ये ईव्हीच्या वापरासाठी खूपच उत्साह आहे. देशभरांतील प्रतिसाद देणार्यांपैकी अंदाजे ४६ टक्के लोकांनी ईव्ही मध्ये बदल करण्यास अनुमोदन दिले आहे, यातून हे दिसते की कर्मचारी यासाठी खूपच उत्साही आहेत. पण, आजमितीस वापर खूपच कमी आहे, कारण संपूर्ण कर्मचार्यांपैकी ९४.३ टक्के डिलिव्हरी पार्टनर्स हे पेट्रोलवर चालणारी वाहने वापरत आहेत. या निष्कर्शांतून असे दिसून येते की उत्सुकता आणि वापर यामध्ये काही सुविधात्मक अडचणी आहेत, वापरास उत्सुकता मोठी आहे.


### सिग्निफायतर्फे इकोलिंक राजस्थान रॉयल्स लिमिटेड एडिशन फॅन्स लॉन्च

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** सिग्निफाय (युरोनेक्स्ट: लाईट), जगातील अग्रगण्य लाइटिंग कंपनीने इकोलिंक एक्सक्लुझिव्ह राजस्थान रॉयल्स लिमिटेड एडिशन फॅन्सची नवी रेंज लॉन्च केली आहे. ही पहिल्यांदाच सादर होणारी खास कलेक्शन असून, चाहत्यांना थंडावा देतानाच त्यांचा क्रिकेटप्रेमीपणा स्टाईलमध्ये दाखवण्याची संधी देते. हँडहेल्ड फॅन्सपासून नेक फॅन्स आणि हाय–परफॉर्मन्स बीएलडीसी फॅन्सपर्यंत, या रेंजमध्ये स्मार्ट कूलिंग, एनर्जी एफिशियन्सी आणि क्रिकेटची आवड यांचा संगम आहे. इकोलिंकने भारतीय ग्राहकांना विश्वासार्ह आणि कार्यक्षम सोल्यूशन्स देण्याच्या बांधिलकीला या लॉन्चद्वारे आणखी बळकटी दिली आहे. ब्रँड आणि राजस्थान रॉयल्सप्रमाणेच ही रेंजही हाय परफॉर्मन्स, दमदार ऊर्जा आणि जिंकण्याची जिद्द यांचे प्रतीक आहे. बीएलडीसी फॅन टेक्नॉलॉजीमुळे या फॅन्सना शक्तिशाली कूलिंग, विश्वासार्ह परफॉर्मन्स आणि ऊर्जा बचत मिळते, ज्यामुळे ते जितके आकर्षक आहेत तितकेच उपयुक्तही आहेत.

### श्रीदत्त मूर्तीची चांगदेव नगर येथे उत्साहात प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न

■ जनप्रवास वार्ताहार



**पुणतांबा :** चांगदेवनगर येथील चांगदेव कारखान्याच्या आवारामध्ये असलेल्या पुरातन दत्त मंदिराचा नुकताच जीर्णोद्धार करून श्री दत मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यानिमित्त तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. दत्तगुरूंच्या मूर्तीची मिरवणूक , विविध धार्मिक विधी व पूजा संपन्न झाली येथील सद्गुरु गंगागिरी महाराज आश्रमाचे महंत विजयानंदगिरी महाराज, पायला यांचे कीर्तन होऊन त्यांच्या हस्ते विधिवत दत्तगुरुंच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी महाराजांनी श्री दत्त विषयी महती सांगून श्री दत्तात्रय यांची उपासना करण्याचे आवाहन केले प्राणप्रतिष्ठा सोहळ्या नंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भोरकडे , भोला उदावंत, संगीता बोरकडे, कारखान्याचे व्यवस्थापक बी एस पाटील आदिसह ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते

### सोफी चौधरीच्या सहभागाने ॲमेझॉन एमएक्स प्लेयरची हाय एनर्जी फिटनेस सिरीज 'फेमसली फिट' चर्चेत

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** ॲमेझॉन एमएक्स प्लेयर या भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात–समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज फिटनेस शो फेमसली फिट हा एक पूर्णपणे नवीन साप्ताहिक फिटनेस आणि जीवनशैली शो प्रदर्शित केला. सोफी चौधरी ने सूत्रसंचालन केलेल्या या सहा एपिसोडच्या सिरीजमध्ये तंदुरुस्ती, प्रसिद्धी आणि स्पष्ट संभाषण निराळीच उंची गाठणार. ज्यामुळे प्रेक्षकांना भारतातील काही सर्वात लोकप्रिय सेलिब्रिटींमागील दिनचर्या आणि कथांवर एक अनफ़िल्टर्ड दृष्टीकोन मिळतो.

# श्रीराम नवमी जन्मोत्सवानिमित्त राहाता शहर 'जय श्रीराम, जय हनुमान'च्या जय घोषाने दुमदुमून गेले

■ जनप्रवास वार्ताहार

**राहाता :** प्रभू श्रीराम,श्री हनुमान,श्री.महादेव व छत्रपती संभाजी राजे यांच्या मूर्ती व देखाव्यांचे आकर्षक विद्युत व फुलांनी सजवलेल्या रथासह मुंबईचे वंदन ढोल ताशा पथक व नाशिकचे क्षत्रिय कुलावंतस ढोल ताशा पथका च्या तालबद्ध निनादाने राहाता येथील विश्व हिंदू परिषद ,बजरंग दल,श्री.राम रक्षा सेवा मंडळ, दुर्गा वाहिनी व राहाता प्रखंड यांच्या संयुक्ताने श्री.रामनवमी जन्मोत्सवाचे निमित्ताने गुरुवारी आयोजित केलेल्या भव्य दिव्य शोभा यात्रेने राहते कर तरुणाई सह महिला पुरुषांनी मनसोक्त आनंद घेत राहाता शहर जय श्रीराम जय हनुमान च्या जय घोषाने दुमदुमून टाकले.

श्रीराम नवमी जन्मोत्सवानिमित्त समस्त विश्व हिंदू परिषद, बजरंग दल सह विविध हिंदू संघटनांनी शहरातील प्रमुख मार्गासह नगर मनमाड महामार्ग वर भव्य कमानी तसेच भगव्या पताका व विद्युत रोषणाई करीत हिंदूंचे दैवत प्रभू श्रीरामांच्या जन्मोत्सवाचे भव्य दिव्य स्वागत केले सायंकाळी ६ वाजता राहाता बस स्थानकापासून सुरू झालेल्या सजवलेल्या चार आकर्षक रथ व ढोलीबाजाच्या पथकांचे या शोभायात्रेचे सर्वात मोठे आकर्षण ठरले. हजारो नागरिक महिला पुरुष व तरुणाईने या शोभायात्रेत सहभागी होऊन डीजे वर राम भक्ती गीतांच्या तालावर नाचत व श्रीरामाचा जल्लोषात जयघोष करी मनसोक्त आनंद घेतला. पाच तास चाललेली ही शोभायात्रा



श्री राम मंदिर ( गढी जवळ) विसर्जित करण्यात आली.

यापूर्वी राहाता शहरातील श्रीराम मंदिरामध्ये दुपारी १२ वाजता अतिशय उत्साहात शेकडोंच्या उपस्थितीत श्रीराम जन्मोत्सव संपन्न झाला राहाता येथील श्री मारुती बाबा चव्हाण भजनी मंडळ पथकाने सुमारे दोन तास वारकरी संप्रदायातील तसेच श्री रामाचे जाऊन उत्सवाला शोभा आणली यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उत्तर जिल्हा संघटक श्री किशोरजी निर्मळ,श्रीरामपूर येथील जिल्हा सत्र न्यायाधीश मा.देशपांडे, कैलास सदाफळ ,गटनेते मुन्नाभाई शहा ,नगरसेवक दशरथ तुपे , डॉक्टर राजेंद्र पिपाडा आधीसह मोठ्या संख्येने महिला पुरुष भाविक उपस्थित होते श्री.दत्त मंदिर मंगल कार्यालय व साई मंदिर कार्यालयाचे तसेच उत्सव समितीचे अध्यक्ष दीपक गांधी तसेच पांडुरंग भातोडे, नानासाहेब बोठे,ॲड. राजेंद्र गांधी ॲड.गोविंद करमासे,प्रणव गांधी,प्रसन्न गांधी आदींनी उपस्थितांचे स्वागत केले बजरंग दलाच्या वतीने सर्व भाविकांना महाप्रसाद भोजन यावेळी देण्यात आले.

## मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल; व्हाईस चेअरमनपदी कैलास चावरे यांची बिनविरोध निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी बाबासाहेब मुदगल तर व्हाईस चेअरमन पदी कैलास चावरे यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेचे कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी ज्योतीताई हराळे यांनी पाहिले.



चेअरमन पदासाठी बाबासाहेब मुदगल यांच्या नावाची सूचना संचालक सोमनाथ सोनवणे यांनी मांडली तर अनुमोदन संचालिका प्रमिलाताई पवार यांनी दिले. त्याचप्रमाणे व्हाईस चेअरमन पदासाठी कैलास चावरे यांच्या नावाची सूचना संचालक बलराज गायकवाड यांनी केली तर अनुमोदन संचालक अजय कांबळे यांनी दिले.

या प्रसंगी तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, माजी चेअरमन विजय कोतकर, माजी व्हॉइस चेअरमन किशोर कानडे, संचालक सतीश ताठे, विकास गीते, गुलाब गाडे, शेखर देशपांडे, बाळासाहेब गंगेकर, बाळासाहेब पवार, कार्यलक्ष्मी संचालक आनंद तिवारी आदींसह कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गॅस टंचाईच्या काळात अवैध रिफिलिंगवर कारवाई; आरोपी जेरबंद ३३,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर शहरातील गुलमोहर रोड परिसरात घरगुती गॅस टाक्यांमधून व्यावसायिक गॅस टाक्यांमध्ये अवैधरित्या रिफिलिंग करणाऱ्या आरोपीवर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत एकास जेरबंद केले. या कारवाईत एकूण ३३,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात अवैध गॅस साठवणूक व रिफिलिंग करणाऱ्यांवर कारवाई सुरू आहे. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते. दि. २६ मार्च २०२६ रोजी पेट्रोलिंग दरम्यान पथकाला गुलमोहर रोड, पारिजात चौकाजवळील आम्रपाली गार्डन समोरील पत्र्याच्या गोडाऊनमध्ये अवैध रिफिलिंग सुरू असल्याची माहिती मिळाली. पथकाने तत्काळ छापा टाकून शहानवाज शौकत सय्यद (वय २४, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) यास रंगेहाथ ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातून १० एच.पी. कंपनीचे गॅस टाक्या (११,००० रुपये), दोन इलेक्ट्रिक मोटार मशीन (२०,००० रुपये) व ५ लहान गॅस टाक्या (२,५०० रुपये) असा एकूण ३३,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत आरोपीने हे रिफिलिंग साद अन्वर खान (रा. मुकुंदनगर, सध्या फरार) याच्या सांगण्यावरून करत असल्याची कबुली दिली आहे.

## राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची जयंती अहिल्यानगर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी किर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन केले आहे.मानवांनो माणुसकीला जागा, जरा माणसात मिसळूनी वागा.असा दिव्य संदेश महान तपस्वी राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी दिला आहे. राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी प्रत्येकाने माणुसकीचा धर्म पाळावा.असे सांगितले आहे. राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांचे विचारांचे अनुकरण केल्यास



जीवन सफल होईल.राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी संपूर्ण जगाला मानवतेची शिकवण दिली.असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले आहे.

टिळक रोड येथील पटेल मंगल कार्यालय येथे अहिल्यानगर कैकाडी समाज संघटनेच्या वतीने राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची जयंती व रामनवमी मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.यावेळी भजन व प्रवचनाचा कार्यक्रम झाला.अहिल्यानगर येथील कैकाडी समाज संघटनेने महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीला जाहीर पाठिंबाचे पत्र दिले आहे.राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची महाआरती उपमहापौर धनंजय जाधव, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, पै.महेश लोंढे,

यांच्या हस्ते करण्यात आली.यावेळी भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, उद्योजक विनोद पुंड, अहिल्यानगर कैकाडी समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड.विनोद गायकवाड, डि. आर.गायकवाड, शहराध्यक्ष विशाल माने, शहर उपाध्यक्ष किशोर जाधव, सचिव राजेंद्र गायकवाड, बाबासाहेब जाधव, महादेव माने, संतोष गायकवाड, के एस माने, फुलचंद जाधव, बी.के.माने, शिवनाथ गायकवाड, भिमराज गायकवाड, हौशीराम गायकवाड, मुलुखुराज गायकवाड, कुंडलिक जाधव, आसाराम जाधव, निनाद गायकवाड, संदीप माने, पार्थ गायकवाड आदींसह समाज बांधव भगिनी उपस्थित होते.

## अहिल्यानगर शहरात दहा वर्षांनंतर पारंपरिक मार्गावर श्रीराम नवमी मिरवणूक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरात श्रीराम नवमी निमित्त सायंकाळी काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. विशेष म्हणजे, गेल्या तब्बल १० वर्षांपासून बंद असलेल्या पारंपरिक आशा टॉकीज मार्गावरून यंदा पुन्हा मिरवणूक काढण्यात आल्याने नागरिकांमध्ये विशेष आनंद व्यक्त झाला. 'जय श्रीराम'च्या घोषणांनी आणि डीजेच्या दणदणाटाने शहर दुमदुमून गेले होते. मोठ्या संख्येने नागरिक या मिरवणुकीत सहभागी झाले होते. तरूणांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. या मिरवणुकीत हिंदू राष्ट्र




सेना, सकल हिंदू समाज, वास्तव कंपनी आणि श्रीराम सेना बोल्हेगाव या चार मंडळांचा सहभाग होता. शहराचे आमदार संग्राम जगताप यांची उपस्थिती मिरवणुकीत विशेष आकर्षण ठरली. डीजेच्या तालावर त्यांनी ठेका धरत नृत्य केल्याचे पाहायला मिळाले, ज्यामुळे उपस्थितांमध्ये आणखी उत्साह निर्माण झाला. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण मिरवणूक शांततेत आणि सुरळीत पार पाडली.

## निमगाव वाघा येथे श्रीराम नवमी उत्साहात

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** निमगाव वाघा (ता. नगर) येथे श्रीराम नवमीचा पवित्र उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. गावात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या निमित्ताने श्रीराम जन्मोत्सव मोठ्या श्रद्धेने पार पडला. गेली सलग ३९ वर्षे ही परंपरा कायम राखत दरवर्षी सप्ताहादरम्यान रामजन्मोत्सव साजरा झाला.



श्री नवनाथ महाराज मंदिरात हा धार्मिक सोहळा पार पडला. मंदिर परिसरात रामनामाच्या गजराने वातावरण भारावून गेले होते. महिलांनी पारंपरिक पद्धतीने पाळणा हलवून प्रभू श्रीरामांच्या जन्माचे स्वागत केले. त्याचबरोबर भक्तीगीत, अभंग व भजनांच्या सादरीकरणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

या सोहळ्यात आशाबाई ठाणगे, वीना बोडखे, कमल शिंदे, सुनीता डोंगरे, अनिता खांदवे, मंदा खळदकर, लता फलके, सुमन ठाणगे आदी महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

यावेळी माजी सरपंच साहेबराव बोडखे, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, भागचंद जाधव, प्रशांत जाधव, एकनाथ डोंगरे, नामदेव फलके, एकनाथ धायतडक, गोरख फलके गुरुजी, सखाराम फलके, ज्ञानदेव जाधव, अतुल फलके, मारुती फलके आदी मान्यवर उपस्थित होते.

## बुवासाहेब महाराज यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी गेणूभाऊ तोडमल तर उपाध्यक्षपदी गणेश भांड व सागर शिंदे यांची निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील राहुरी खुर्द येथील जागृत देवस्थान बुवासाहेब महाराज यात्रा कमेटीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नागरीक गेणूभाऊ तोडमल यांची तर उपाध्यक्षपदी गणेश भांड व सागर शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली. खजिनदार पदी भाऊराव शेडगे यांची सह खजीनदारपदी साहेबराव मोरे यांची निवड करण्यात आली.

राहुरी खुर्द येथील जागृत देवस्थान बुवासाहेब महाराज यांच्या यात्रा कमेटीच्या उत्सव समितीच्या कार्यकरिणी नेमणुकीच्या नियोजन बैठकीचे आयोजन बुवासाहेब मंदिराच्या सभामंडपात करण्यात आले होते, या बैठकीचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरीक मारुती शेडगे हे होते यावेळी साहेबराव मोरे यांनी मागील वर्षाच्या हिशोबाचे वाचन करून शिल्लक रक्कमेचे ग्रामस्था समोर वाचन करण्यात आले. त्यानंतर यात्रा कमेटीची कार्यकारिणी सर्वानुमते ठरवून







वरील निवडी जाहीर करण्यात आली.

यावेळी युवक वर्गाकडून डीजे वाजवण्याची परवानगी मिळवण्यासाठी यात्रा कमेटीने सहकार्य करावे अशी मागणी करण्यात आली.अध्यक्ष गेणूभाऊ तोडमल यांनी पारंपरीक वाद्य म्हणजे सनई, डोल ताशा, झांज पथक, बॅन्ड पथक आदि वाद्य वाजविण्याचा आग्रह करुण डीजेसाठी पोलीस विभागाच्या परवानगीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्रस्ताविक डॉ. तनपुरे सह साखर कारखान्याचे माजी संचालक नंदकुमार डोळस यांनी आभार मानले अध्यक्ष गेणूभाऊ तोडमल यांनी जत्रा शांततेत पार पाडावी त्यांचे मत मांडले, बैठकीत ग्रामपंचायत सदस्य नरेंद्र शेटे, राम तोडमल, अमोल डोळस, यांसह ज्येष्ठ नागरीक साहेबराव धोत्रे, निसारभाई शेख, ज्ञानदेव तोडमल, भगवान बाबा पतसंस्थेचे चेअरमन श्री दिलीपराव आघाव, पप्पू पाटोळे, उमाकांत घोरपडे, आकाश शेटे, सुनिल कुमावत, बाबासाहेब पोपळघट, गोरख ससाणे, प्रशांत डोळस,चेतन घोरपडे, यश गोल्हार, निखिल राऊत, बबलू पाटोळे, आशुतोष खाचणे, राजेंद्र खोजे, सुनिल तोडमल, एकनाथ माळी ,दिलीप क्षीरसागर, प्रशांत चोपडे मनोज गरड,संजय डोळस, यांसह पत्रकार भिमराज गुंड अशोक मंडलिक, यांसह असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते,

# सोलर पंप योजनेत फसवणुकीचा पर्दाफाश; श्रीगोंद्यात ३८ शेतकऱ्यांना लाखोंचा फटका

## खोट्या माहितीच्या आधारे अर्ज मंजुरीचे आमिष; आरोपीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात शासनाच्या सोलर पंप योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, बनावट माहिती व खोट्या आश्वासनांच्या जोरावर अनेक शेतकऱ्यांकडून लाखो रुपये उकळल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणामुळे तालुक्यात खळबळ उडाली असून संबंधितांवर तातडीने कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

या प्रकरणी वडाळी (ता. श्रीगोंदा) येथील अविनाश भाऊसाहेब काटे यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जानेवारी २०२५ पासून सोलर पंप योजनेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होती.

याच काळात केडगाव येथील किरण आसाराम बोरुडे यांनी स्वतः ला अधिकृत एजंट असल्याचे सांगत शेतकऱ्यांशी संपर्क साधला. त्यांनी कोटेशनच्या माध्यमातून अर्ज भरून देण्याचे, जलद मंजुरी मिळवून देण्याचे तसेच अवघ्या १५ दिवसांत सोलर पंप बसवून देण्याचे आश्वासन दिले. यासाठी शासनाच्या शुल्काव्यतिरिक्त अधिकची रक्कम शेतकऱ्यांकडून घेतली गेली.

विश्वासाने पैसे भरलेल्या शेतकऱ्यांना काही दिवसांनी अर्ज अचानक ब्लॉक झाल्याचे लक्षात आले आणि फसवणुकीचा प्रकार उघड झाला.

प्राथमिक तपासात अर्ज प्रक्रियेत बनावट व चुकीचे ग्राहक क्रमांक वापरण्यात आल्याचे समोर आले आहे. तसेच इतर ग्राहकांचे आधीच अस्तित्वात असलेले क्रमांक वापरून अर्ज सादर करण्यात आल्याचेही स्पष्ट झाले आहे. यामुळे ही फसवणूक पूर्वनियोजित असल्याचा संशय बळावला आहे.

या प्रकरणात आतापर्यंत ३८ शेतकरी बाधित झाले असून सुमारे ५.४३ लाखांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. मात्र आणखी काही शेतकऱ्यांचे पैसे अडकले असल्याने एकूण रक्कम ९ लाखांपेक्षा जास्त असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

संबंधित आरोपी किरण बोरुडे याच्यावर यापूर्वीही इतर तालुक्यांमध्ये अशाच प्रकारच्या फसवणुकीचे आरोप असल्याचे समोर आले आहे. श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात व त्याच्या सहकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल असल्याची माहिती मिळाली आहे. पोलिसांनी सखोल तपास केल्यास मोठे जाळे उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

न्यायासाठी शेतकऱ्यांची मागणी

या प्रकरणातील आरोपीवर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी आणि सर्व बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गाने

# व्यापारी महासंघाच्या नूतन पदाधिकाऱ्यांचे आ. आशुतोष काळेंनी केले अभिनंदन



■ जनप्रवास वार्ताहार

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाची नवीन कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून यामध्ये अनुभवी व अभ्यासू नेतृत्वाची निवड करण्यात आली आहे. महासंघाच्या अध्यक्षपदी ओमप्रकाश (काका) कोयटे, कार्याध्यक्षपदी अजित लोहाडे व सुधीर डागा, तर उपाध्यक्षपदी संजय भन्साळी आणि एस.जे. एस हॉस्पिटलचे चांगदेव कातकडे यांची निवड झाली आहे. या नूतन कार्यकारणीसह निवड झालेल्या सर्व सदस्यांचे आमदार आशुतोष काळे यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

कोपरगावची बाजारपेठ अधिक समृद्ध करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून शहराचा अनेक वर्षांपासूनचा प्रलंबित पाण्याचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे शहराबाहेरील व्यापारी आता व्यवसायानिमित्त कोपरगाव शहरात येत आहेत. यामुळे शहराची व्यावसायिकता वाढत असून स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध होत आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांचे जाळे विकसित करून दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागला असल्याने कोपरगावची बाजारपेठ गजबजली आहे. याचा शहराच्या अर्थ व्यवस्थेवर सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. शहरामध्ये व्यवसाय सुरु करणाऱ्यांसाठी नवीन व्यापारी संकुले उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. यामुळे आगामी काळात कोपरगावची बाजारपेठ एक महत्त्वाचे व्यापार केंद्र म्हणून ओळखली जाईल. कोपरगाव शहराला विकसित करण्यासाठी महायुती शासनाच्या माध्यमातून भरीव निधी उपलब्ध करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावून शहराचा चेहरामोहरा बदलवला आहे. यापुढे हि शहर विकासाची कामे अविरतपणे सुरु राहणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले. तसेच नूतन कार्यकारणीत युवा व्यावसायिकांना संधी दिली आसल्यचा आनंद व्यक्त करत व्यापारी महासंघ शहरातील व्यापाऱ्यांचे प्रश्न तळमळीने सोडवत आहे. याचा अभिमान वाटत असून या पुढील काळातही व्यापारी महासंघ असेच काम करीत राहिला असा विश्वास व्यक्त करून आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव तालुका व्यापारी महासंघच्या नूतन कार्यकारणीचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# लक्ष्मी नगर येथे मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## सेवा आरोग्य फाउंडेशनच्या उपक्रमातून नागरिकांना मोठा लाभ



■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे/कोथरूड :** सेवा आरोग्य फाउंडेशनच्या वतीने लक्ष्मी नगर येथील साप्ताहिक दवाखान्यात आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समाजाप्रती असलेल्या बांधिलकीतून राबविण्यात आलेल्या या आरोग्य उपक्रमामुळे परिसरातील अनेक गरजू नागरिकांना दिलासा मिळाला.

या शिबिराचा विशेषतः निराधार ज्येष्ठ नागरिक, कष्टकरी महिला, कामगार वर्ग तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा फायदा झाला.

शिबिरामध्ये एकूण ३५ रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या, तर ६२ नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. लक्ष्मी नगर परिसरातील अनेक रहिवाशांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराबाबत आयोजकांनी सांगितले की, निरोगी दृष्टी, आनंदी सृष्टी या संकल्पनेतून गरजू रुग्णांच्या जीवनात प्रकाशाची किरणे पोहोचविण्याचे समाधान या उपक्रमातून मिळाले.

या उपक्रमासाठी वस्ती समन्वयक उज्वला पवार, रेणुका नेत्रालय व संजीवनी हॉस्पिटल यांच्या सहकार्याने शिबिर पार पडले. डॉ. वैशाली ओक, प्रकल्प समन्वयक काजल कंधारे, वंदना पवार यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच बाळासाहेब दांडेकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

यशस्वी आरोग्य उपक्रम राबविल्याबद्दल नागरिकांनी सेवा आरोग्य फाउंडेशनचे शतशः आभार व्यक्त केले.

# ऐतिहासिक एम्प्रेस बोटॅनिकल गार्डनच्या अस्तित्वावर संकट

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** शहराचा ऐतिहासिक वारसा आणि पर्यावरणाचा अमूल्य ठेवा असलेले 'एम्प्रेस बोटॅनिकल गार्डन' सध्या एका गंभीर संकटाचा सामना करत आहे. गार्डनची सुमारे १ एकर जागा न्यायालयीन बांधकामासाठी हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव शासनाकडून रेटला जात असून, संस्थेचा याला तीव्र विरोध आहे. 'दि ॲग्री-हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया' या संस्थेमार्फत १८९२ सालापासून, म्हणजेच गेल्या १३४ वर्षांपासून या बागेचे आणि येथील दुर्मिळ वृक्षांचे जतन अत्यंत निष्ठेने केले जात आहे. शासनाने या जागेच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू केल्यापासून संस्थेने वेळोवेळी आंदोलने केली, निवेदने दिली आणि आपला निषेध व्यक्त केला. मात्र, संस्थेचे कोणतेही म्हणणे विचारात न घेता शासन केवळ दडपशाहीचा मार्ग अवलंबत आहे. ही जागा ताब्यात घेण्याचा प्रयत्न म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण करणाऱ्या एका स्वायत्त संस्थेच्या हक्कांवर गदा आणण्याचा प्रकार आहे.

# ३१ मार्चपूर्वी कर्जफेड करा; कर्जमाफी योजनेचा लाभ घ्या : नागवडे यांचे आवाहन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** शेतकरी सभासदांनी आपल्याकडील दीर्घ मुदत, मध्यम मुदत तसेच पशुपालन कर्जाची थकबाकी ३१ मार्चपूर्वी भरून शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र (दादा) नागवडे यांनी केले आहे.

प्रसिद्धी पत्रकाद्रे नागवडे यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने कर्जदार शेतकरी सभासदांसाठी ही महत्त्वपूर्ण कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत थकीत कर्जदारांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत लाभ मिळणार आहे.

मात्र, या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी आपले दीर्घ मुदत, मध्यम मुदत तसेच पशुपालन कर्जाची परतफेड करणे आवश्यक आहे. नियमित कर्जदारांनाही ५० हजार रुपयांच्या लाभासाठी वेळेत कर्जफेड करणे बंधनकारक आहे. अन्यथा, त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, कर्ज थकीत राहिल्यास सध्याच्या १३ टक्के व्याजदराऐवजी १५ टक्के व्याज लागू होणार असून त्यामुळे शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. याउलट वेळेत कर्जफेड केल्यास जिल्हा सहकारी बँकेकडून पुढील कर्ज मिळविणेही सुलभ होईल, असे त्यांनी नमूद केले.

तरी सर्व कर्जदार शेतकरी सभासदांनी आपल्या कर्जाची रक्कम वेळेत भरून शासनाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन राजेंद्र (दादा) नागवडे यांनी केले आहे.

# जामखेड सेंट्रल बँकेत कॅश टंचाई; अधिकाऱ्यांची उद्धट भाषा; ग्राहकांचा संताप




■ जनप्रवास प्रतिनिधी

**जामखेड :** जामखेड येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्ये कॅश (रोख) उपलब्ध नाही. आधिकारी कर्मचारयांची उध्दट भाषा. समन्वय होत नसल्याने ग्राहकांमध्ये तीव्र नाराजीचे व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः महिला शेतकरी व सोसायटीचे कर्ज व्यवहार करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

बँकेत पैसे काढण्यासाठी आलेल्या नागरिकांना कॅश उपलब्ध नाही असे सांगण्यात येत असल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेकांनी बँक व्यवस्थापनाकडे नाराजी व्यक्त केली. कर्जाचे हप्ते, शेतीची कामे तसेच दैनंदिन खर्चासाठी पैसे आवश्यक असताना रिकाम्या हाताने परत जावे लागत असल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढला आहे.याबाबत बँकेच्या व्यवस्थापकांना विचारणा केली असता, सध्या कॅश उपलब्ध नाही. सोमवारी कॅश येईल का, याबाबत निश्चित सांगता येत नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.दरम्यान, कॅश टंचाईची समस्या लवकरात लवकर सोडवावी, अशी मागणी बँकेच्या ग्राहकांमधुन होत आहे.

# मुस्लीम बांधवांचा इज्तेमा सुरेगावला होणार

## इज्तेमाच्या मंडप उभारणीचा मा.आ.अशोकराव काळेंच्या हस्ते प्रारंभ



■ जनप्रवास वार्ताहार

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव,कोळपेवाडी, शहाजापूर, वेळापूर, कोळगाव-थडी आदी गावातील व परिसरातील मुस्लिम बांधवांच्या मागणीनुसार कोपरगाव-राहाता तालुक्याच्या वतीने आयोजित करण्यात येणारा इज्तेमा हा सुरेगाव-शहाजापूर परीसरात होणार आहे. या इज्तेमाच्या मंडप उभारणीच्या कामाचा शुभारंभ कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व उद्योग समुहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या हस्ते गुरुवार (दि.२६) रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

मुस्लिम बांधव एकाच ठिकाणी एकत्र येवून सामुहिक प्रार्थना करण्यासाठी व मुस्लीम बांधवांना धार्मिक प्रबोधनासाठी इज्तेमा आयोजन करण्यात येते. हा इज्तेमा आपल्या गावात व्हावा अशी अनेक गावातील मुस्लीम बांधवांची इच्छा असते. ही सुरेगाव, कोळपेवाडी, शहाजापूर, वेळापूर, कोळगाव-थडी आदी गावातील मुस्लीम बांधवांची इच्छा पूर्ण झाली असून कोपरगाव-राहाता तालुक्याच्या वतीने आयोजित करण्यात येणारा इज्तेमा हा सुरेगाव-शहाजापूर परीसरात मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती वाल्मिकराव कोळपे, गौतम बँकेचे मा.व्हा.चेअरमन राजेंद्र ढोमसे, शहाजापूरचे उपसरपंच शरद वाबळे, कोळपेवाडीचे उपसरपंच सागर कोळपे,सुरेगावचे उपसरपंच दीपक कदम, कचरू कोळपे, सुखदेव कोळपे, भाऊसाहेब कोळपे, पोपटराव जुंधारे, पांडुरंग ढोमसे, पोलीस पाटील इंद्रभान ढोमसे, प्राचार्य नूर शेख, शिवाजी वर्पे, डॉ.इलियास सय्यद, ॲड.शापिक शेख,शकील पटेल, अल्ताफ पटेल, रज्जाक खाटिक, शब्बीर तांबोळी, शफिक शेख, सोयेब पटेल, मोहीज मणियार आदींसह मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पतसंस्थेच्या चेअरमनपदी दत्तात्रय कदम, व्हाईस चेअरमनपदी भारती बरे यांची निवड



■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि विज्ञान प्राध्यापक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदांच्या निवडीसाठी जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत सर्वानुमते दत्तात्रय कदम यांची चेअरमनपदी, तर सौ. भारती बरे यांची व्हाईस चेअरमनपदी निवड करण्यात आली.

यावेळी संस्थेचे संचालक डॉ. विक्रम कड, डॉ. नारायण मुसमाडे, योगेश भिंगारदे, आप्पासाहेब चोपडे, सौ. माधुरी औताडे तसेच कर्मचारी व सभासद उपस्थित होते. ही पतसंस्था जिल्ह्यासह राज्यात नावाजलेली असून सभासदांच्या आर्थिक उन्नतीत तिचा मोलाचा वाटा आहे.

नुकतीच झालेली ही निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे व संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी अभिनंदन केले.

# कोलगेट टोटल ने केली मुंबई इंडियन्स बरोबर भागीदारी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** मौखिक आरोग्य आणि आरोग्या विषयीची आपली वचनबध्दता वाढवत कोलगेट टोटल तर्फे आज मुंबई इंडियन्स बरोबर त्यांचा डेंटल परफॉर्मन्स पार्टनर म्हणून भागीदारी केल्याची घोषणा केली असून यामुळे २०२६ च्या मौसमापूर्वी मौखिक आरोग्य हे खेळाडूंसाठी प्राथमिक असल्याचे अधोरेखित केले.

कोलगेट तर्फे प्लॉट (परफॉर्मन्स लिंक्ड ओरल टेस्ट) या सर्वसमावेशक हेल्थ स्क्रीनिंग फ्रेमवर्क ची सुरुवात करण्यात आली असून याचे डिझाईन हे खेळाडूंच्या दातांच्या आरोग्याची तपासणी आणि काळजी घेण्यासाठी करण्यात आले आहे.

ही भागीदारी टीमच्या कार्यक्षमतेच्या फ्रेमवर्क मध्ये एकत्र होऊन खेळाडूंच्या मैदानातील तग धरण्याची क्षमता आणि त्यातून सावरण्यासाठी शारीरीक आरोग्य हा एक महत्त्वाची गोष्ट आहे हे ओळखून करण्यात आली आहे.

तोंड हे शरीराचे प्रवेशद्वार आहे. वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे असे दिसून येते की जंतू हे तुमच्या शरीरात तोंडावाटे प्रवेश करु शकतात ज्यामुळे सूज येऊन बरे होण्याची प्रक्रिया लांबते त्यामुळे खेळाडूची कार्यक्षमताही कमी होते. म्हणूनच मैदानात ज्यावेळी सर्वो त्कृष्ट कार्यक्षमतेची गरज असते अशा वेळी तोंडातील जंतूंची निर्मिती रोखणे महत्त्वाचे असते.

या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आघाडीची क्लिनिशियन डॉ. मोएझ खाकियानी हे मुंबई इंडियन्सच्या लोकांच्या दातांची तपासणी ही अत्याधुनिक अशा इंट्राओरल स्कॅनिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यासह डब्ल्यूएचओ वर आधारीत मौखिक तपासण्या करुन खेळाडूंच्या मौखिक आरोग्याचा अभ्यास करुन त्यांची फिटनेस आणि कार्यक्षमते वर परिणाम होऊ शकणार्या समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

# अपघातग्रस्त शिक्षकाला लुटले; दुचाकीसह मोबाईल व रोख रक्कम चोरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** अपघातात जखमी होऊन बेशुद्ध पडलेल्या एका शिक्षकाची संधी साधून अज्ञात चोरट्याने त्यांची दुचाकी, मोबाईल आणि रोख रकमेसह महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेल्याची धक्कादायक घटना राहुरी फॅक्टरी परिसरात घडली आहे. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राहुरी तालुक्यातील केसापूर येथील रहिवासी असलेले दत्तात्रय तुकाराम शिंदे (वय ५१, व्यवसाय- शिक्षक) हे २३ मार्च रोजी सायंकाळी ८ वाजेच्या सुमारास देवळाली प्रवरा येथून राहुरी फॅक्टरीकडे आपल्या दुचाकीवरून जात होते. श्रीरामपूर रोडवरील देवळाली कॅम्प परिसरात त्यांची दुचाकी घसरल्याने (स्लिप झाल्याने) ते खाली पडले आणि गंभीर मार लागल्याने बेशुद्ध झाले. शिंदे हे बेशुद्ध अवस्थेत रस्त्याच्या कडेला पडलेले असताना, मदत करण्या ऐवजी एका अज्ञात चोरट्याने त्यांच्या हतबलतेचा फायदा घेतला. चोरट्याने त्यांची ६० हजार रुपये किमतीची टीव्हीएस ज्युपिटर स्कुटी (क्रमांक चक१७ ६अ २०१३), १० हजार रुपये किमतीचा विवो मोबाईल, खिशातील १५०० रुपये रोख आणि महत्त्वाचे दस्तऐवज लंपास केले. शुद्धीवर आल्या नंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी दत्तात्रय शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस अंमलदार बाबासाहेब शेळके हे करत आहेत.

# आजही माणसाच्या मनाची विचार करण्याची धारणा बदललेली नाही

विज्ञानाच्या प्रगतीने जग फार पुढे गेले तरी आजही माणसाच्या मनाची विचार करण्याची धारणा बदललेली नाही. भारतीय समाजात स्त्रीचे स्थान आज कोणते आहे हे समजणे कठीण. ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील स्त्रियांचा विचार करता ग्रामीण भागातील अशिक्षित स्त्रियांना आजही घरातीलच कामात गाडले जाते. तर शिक्षित स्त्रीया जग बदलते त्याप्रमाणे बदलून पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून जीवनमान जगताना दिसतात. हे जरी खरे तरी जन्माच्या बाबतीत आजही मुलाचाच आग्रह केला जातो. मुलगी नको ही भावना वाढीस लागलेली आहे. जरी कायद्याने गर्भलिंग चाचणी घेण्यास बंदी केली असली तरी चोरुन गर्भलिंग चाचणी केली जाते हे सर्वज्ञात आहे. तरी देखील शासनाने इतके उपाय करुन काही उपयोगाचे नाही. केवळ मानसिकता बदलणेच गरजेचे आहे. मग मुलगी असो किंवा मुलगा हा भेदभाव करुच नये. कारण मुलगा आणि मुलगी याच्यामध्ये फरक करणे म्हणजे एकप्रकारे



आपण हत्याच करण्यासारखे आहे. मुलीला एक वेगळी वागणूक आणि मुलाला एक वेगळी वागणूक अशा प्रकारच्या मानसिकतेचा समाजावर अनिष्ट परिणाम घडून येईल. तेव्हा मुलगा असो वा मुलगी भेदभाव नको. भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे अथवा नाही हा वादाचा मुद्दा होऊ शकतो. मात्र, देशाने जी प्रगती साधलेली आहे त्यात स्त्रियांचं योगदान नि:संशय फार मोठं आहे. स्त्रियांचं कर्तृत्व प्रत्येक क्षेत्रात दिसून येत आहे; पण वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने भारतात महिलांना नीटपणे वागवलं जात नाही, त्यांना बरोबरीची नव्हे, तर कनिष्ठ दर्जाची वागणूक मिळते असा निष्कर्ष एका अहवालात प्रसिद्ध केलेला आहे. अशाच प्रकारचा निष्कर्ष युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडने प्रसिद्ध केलेल्या अहवालातही व्यक्त करण्यात आला आहे. जागतिक लिंगभेद अहवालाप्रमाणे १३० देशांच्या यादीत भारताचा क्रमांक खूप खाली म्हणजे ११३ असा आहे. लिंगभेद दूर करण्यासाठी भारतासारख्या देशाने अधिक संवेदनशील आणि सांस्कृतिक दृष्टीकोन ठेवत त्याप्रमाणे अंमलबजावणी करायला हवी, असे युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडने म्हटलेलं आहे. लिंगभेद दूर करण्यासाठी आखलेली सकारात्मक धोरणं, संसदेत स्त्रियांना राखीव जागा देण्यासाठीचे प्रयत्न हे उपाय पुरेसे प्रभावी ठरत नसल्याचं वरील दोन अहवालांनी सिद्ध झालेलं आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमप्रमाणे स्त्री-पुरुष लिंगभेदाची दरी जास्त असणाऱ्या वीस देशांच्या यादीत भारताचाही समावेश आहे. स्त्री-पुरुष आर्थिक असमतोलच्या बाबतीत भारत सहाव्या स्थानावर आहे. राजकीय सक्षमीकरणाच्या बाबतीत पंचविसाव्या, तर शालेय उपस्थितीच्या बाबतीत १२८ व्या स्थानावर आहे. आर्थिक सहभाग आणि संधी, शालेय उपस्थिती, राजकीय सक्षमीकरण आरोग्य या क्षेत्रातल्या भरीव कामगिरीमुळे नॉर्वे हा देश अव्वल स्थानवर आहे. डब्ल्यू ई एफमच्या यादीत फिनलँड, स्वीडन, आयर्लंड, न्यूझीलंड, फिलिपाईन्स, डेन्मार्क, नेदरलॅण्डस आणि लॅटव्हिया हे टॉपटेन देश आहेत. चीन ५६ व्या स्थानावर आहे. भारतातील स्त्री-पुरुष लिंगभेदाच्या प्रश्नाला सांस्कृतिक पैलू आहेत. उदाहरणार्थ वंध्यत्व, अशक्तपणा, रक्तदोष, योनीदोष आणि विचार,संसर्ग, नैराश्य आणि दुबळी संतती याबाबतीत भारतीय स्त्रिया आजही भीती, लाज किंवा रीती-रिवाजाच्या दडपणामुळे स्पष्टपणे बोलत नाहीत. स्त्रीचं गर्भाशय आणि मासिक पाळीतला रक्तस्त्राव यावर गर्भाचा दर्जा अवलंबून असतो आणि स्त्रियांमधील वंध्यत्वामुळेच तिला मुलगा होत नाही असे अनेक गैरसमज आजही भारतीय समाजात प्रचलित आहेत. अर्थात, स्त्री-पुरुष लिंगभेदाबाबतीत परिस्थिती बदलत आहे. यामुळे दृष्टीकोन आणि प्रयत्न यात बदल होत आहे. परिस्थिती एकदम बदलणारी नसली, तरी नोंद घेण्यासारखी प्रगती आहे, असं या अहवालात म्हटलेलं आहे.

# बैठकीची खोली घरातील महत्वाची जागा असते

बैठकीची खोली घरातील महत्त्वाची जागा असते. येथे लोकांचे येणे जाणे सुरूच असते व लोक तुमच्या स्वभावाचा अंदाज या खोलीला पाहून करतात.




या खोलीतील दारे, खिडक्या चमकदार करण्यासाठी त्यावर लिंबू लावून एखाद्या बारीक कपड्याने स्वच्छ पुसून काढाव्यात.

टी टेबल काचेचे असेल तर त्यावर थोडंसं पाणी टाकून वर्तमानपत्राने रगडून काढावे. सर्व डाग दूर होतील.

फुलदाणीला चमकदार बनविण्यासाठी त्यावर लिंबू रगडून काही वेळ तसेच सोडून द्यावे. क्रिस्टलला चमकदार बनविण्यासाठी सरसोची (मोहरी) पावडर आणि वनस्पती तेलाच्या पेस्टने स्वच्छ करावे.

ड्रॉइंग रूम किंवा पूजेत ठेवलेल्या चांदीच्या भांड्यांना चमकदार बनविण्यासाठी बेसनात लिंबाचा रस मिसळून लावला पाहिजे. लाकडाच्या फर्निचरवर ओरखडे उमटले असतील तर कॉड लिव्हर ऑइल लावून ठेवावे व दुसऱ्या दिवशी त्या जागेला स्वच्छ केले पाहिजे.

बैठकीच्या खोलीतील कारपेट खराब झालं असेल किंवा त्यावर डाग पडले असतील तर त्या भागावर बटाटा रगडावा. नंतर गरम पाण्याने भजलेल्या कापडाने पुसून काढावे. भिंतीवर खिळा ठोकण्याअगोदर त्याला गरम पाण्यात बुडवून ठेवले पाहिजे व नंतर त्याला ठोकले पाहिजे त्यामुळे भिंतीचे प्लॅस्टर पडत नाही. फ्रेम चांगली लावता येते.तुमच्या कॉम्प्युटरच्या की-बोर्ड किंवा माऊसवर डाग पडले असतील तर त्यावर नेलपेंटचे रिम्हूवर लावून कापसाने पुसून काढावे.

# बरेच लोक मानसिक तणावाला बळी पडतात

आजच्या धावत्या आधुनिक युगात प्रत्येक व्यक्ती हा मानसिक ताणात वावरत असतो. काही लोक त्यातून तरुण जातात. परंतु बरेच लोक त्यात अडकून मानसिक रोगाचे बळी होतात. खरे तर घडणारी प्रत्येक गोष्ट ही घडणारच असते, असा जर विचार केला आणि घडलेल्या घटनेचा व सत्य परिस्थितीचा स्वीकार केला तर या त्रासातून तरून जाणे फार सोपे आहे. परंतु आपण त्याचा स्वीकार करण्यास अयशस्वी होतो, प्रत्येक घटना सकारात्मक दृष्टीने बघणे गरजेचे असते, मनाला ज्या वेळेस या गोष्टीचा स्वीकार होत नाही, त्यावेळेस मानसिक ताण तयार होतो आणि मग हळूहळू मनोविकारची सुरुवात होते.

आपल्या ताण-तणावाची कारणे आपल्याच आत असतात आणि आपण ते शोधले पाहिजे, ती एक मनाची दुर्बलता असते ज्यामुळे आपण सत्य परिस्थिती स्वीकारण्यास असमर्थ ठरतो. मनाच्या दुर्बलतेमुळे सत्य गोष्टीची जाणीव आपल्याला होत नाही, त्यामुळे सत्यता आणि आपल्या अपेक्षा याची जाणीव व त्याचा समतोल ठेवणे कठीण होते. मनाच्या दुर्बलतेमुळे हे सर्व घडत असते, ही दुर्बलता सर्व मनोविकारचे मूळ असते. या मुळे मनात आणखी ताण-तणाव निर्माण होतात, हे जर वारंवार होत राहिले तर त्याचा वाईट परिणाम आपल्या मानसिक आणि शारीरिक प्रकृतीवर होतो. परिणामी नैराश्य, अनेक



मनोविकार, शारीरिक व्याधी उदा: हृदयविकार, मधुमेह, ककरोग, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, होतात. जीवन नकोसे वाटते आत्महत्या करण्याचे विचार येतात. मनाला वारंवार निराश वाटणे, जीवनात आनंद न वाटणे, तहान कमी जास्त होणे, भूक न लागणे किंवा अती भूक लागणे, झोप न येणे किंवा अती झोप असणे,विनाकारण काळजी चिंता वाटणे, श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत धडधड होणे, खूप घाम येणे, कुठल्याही कामात किंवा अभ्यासात रस न राहणे, मानसिक व शारीरिक कमजोरी जाणवणे, स्मरणशक्ती कमी होणे, नकारात्मक विचार येणे, जीवन संपून टाकावे आत्महत्याचे विचार येणे...इत्यादी आनेक लक्षणे मनोविकारत मनाच्या दुर्बलपणामुळे निर्माण होतात. करावे लागतील, भूतकाळचा विचार न करता झालेल्या गोष्टी सोडून द्याव्यात भविष्याची काळजी करू नयेत, तरच आपण वर्तमानकाळात आनंदी राहू शकतो. खुठल्याही घडणा-या घटनेबद्दल खेद न बाळगता घडलेली बरी-वाईट घटना किंवा परिस्थितीचा स्वीकार करणे. रस्त्याने चालत असताना रस्ता जसा आहे तसेच चालावे लागते रस्ता जर नागमोडी वळणाचा असेल तर आपल्याला त्याप्रमाणे वळण घेतच चालावे लागते आपण जर ठरवलं नाही मी सरळच चालेल तर ते शक्य नाही. आपण जन्माला येताना काही आणलेले नसते आणि मृत्यू नंतर काही बरोबर घेऊन जात नाही. उदा:- एक राजा असतो त्याला झोपेत स्वप्न पडते की त्याला दुस-या राजाने कैद केले आणि आता त्याला फासावरती देणार, आणि तो खूप घाबरतो रडू लागतो आता माझ कसं होणार माझ्यामागे माझ्या राज्याचे काय होणार बायका-मुले, आई-वडील यांचं कस होईल. हे स्वप्न पडत असताना त्याची अचानक झोप मोडते बघतोतर तो खुठे फासावर नसून महालात बिछान्यावर असतो हे जाणवल्यावर त्याला खूप आनंद होतो कारण सत्यपरिस्थिती त्याला समजलेली असते ती एक मनाची स्वप्न अवस्था होती. मनाची दुर्बलता ही एक अशीच अवस्था असते ज्यामध्ये सत्य परिस्थितीची जाणीव होऊन त्यातून बाहेर पडणे कठीण होत आणि तो स्वप्नातल्या राज्याप्रमाणे त्याच त्या विचारात गुरफटत जातो आणि मनोविकारचा शिकार होतो.

# विवाह संस्था ही एक गरजेची बाब

विवाहबंधनाच्या बंधात अटकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हे जीवन नकोसे वाटत असते. पर्यायाने जरी हे नको असेल तरीसुद्धा शारिरीक पातळीवर आणि मानसिक पातळीवर परिणाम घडून येऊ नयेत याकरिता प्रत्येक व्यक्तीला विवाह गरजेचा असतोच. जरी विवाहबंधनात अटकून न राहणाऱ्या व्यक्ती मानसिक पातळीवर योग्य असतील याची साशंकता बाळगण्याचे कारणच नाही. वैवाहिक सुख हे मानसिक पातळीवरुन शारीरिक पातळीवर परिणाम करत असते. आणि शारीरिक पातळीवरुन मानसिक पातळीला समाधान मिळते. यातच साऱ्या जीवनाचे सुख लपलेले जरी असले तरी यथासांग आयुष्य जगत असताना प्रत्येक स्त्री-पुरुषाला शरीरसुखाची आवश्यकता असतेच.

आणि स्वच्छंदी व्यक्ती आपल्या मानसिकतेचा भाग म्हणून इतरत्र आधार शोधतात. हे त्यांच्यादृष्टीने योग्य असेल पण सामाजिक मुल्यांचा विचार करता असे स्वच्छंदी जीवन जगणे पूर्णपणे चुकीचे असते. म्हणूनच



पुरातन काळपासून ते आजपर्यंत विवाहसंस्था ही एक गरजेची बाब असून त्याचा सर्वांनाच फायदा होतो. अविवाहित व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे बंधन आपल्यावरती नको असते. त्यामुळेच ते विवाहासारखा प्रकार टाळत असतात. मात्र, वैवाहिक सौख्य हेच खरे सौख्य असते. विवाहपूर्व जीवन हे एक मुक्त संचार करणारे असते. मात्र, विवाहानंतर त्यावरती अनेक बंधने येऊ लागतात आणि अशा प्रकारच्या बंधनांना कोणीच झुगारु शकत नाही. जर झुगारलेच तर त्यामध्ये मिळणारे सुख आणि समाधान आपण एक प्रकारे धुडकावून लावत आहोत हे वास्तव सत्य कोणीही नाकारु शकत नाही. मात्र,

जरी अविवाहित मंडळी आपल्या स्वच्छंदी जीवनाला सुखी समजत असले तरी खरा सौख्याचा खजिना विवाहित मंडळीकडेच असतो. एका संशोधनात आढळलले आहे की, जरी कमी-जास्त प्रमाणात असले तरी लग्नानंतर माणसाचे समाधान वाढते. हे समाधान काही वर्षांपूरते असते की दीर्घकालीनयाविषयी संशोधकात एकमत नाही.

लग्नाला दोन वर्षे होताच बऱ्याच जणांना त्यांचे अविवाहित जीवन यापेक्षा चांगले होते असे वाटते. याविषयी जाणकार म्हणतात, ही सुद्धा माणूस समाधान हळूहळू आत्मसात करीत असल्याची एक प्रक्रिया असते. संशोधक असेही म्हणतात की, लग्नानंतर जास्त आनंद मिळाल्याने माणूस त्यात संतुलन राखू शकत नसतो व त्यामुळे त्याला तो आनंद खटकत असतो. मानसशास्त्रज्ञ याकडे जर एखादा माणूस अचानक श्रीमंत झाला तर काही दिवसानंतर त्याच्या आनंदाची, सुखाची पातळी कमी होणे यादृष्टीने पाहतात.

याप्रमाणेच एखाद्याबाबत एखादी दु:खद घटना झाली तर तो जास्त दिवस दु:खी राहात नाही व लवकरच सामान्य स्थितीत परततो. संशोधक मानतात की, माणसात एक नैसर्गिक चक्र असते जे त्याला आनंदाच्या सरासरी पातळीकडे राखून ठेवते. ज्या व्यक्ती लग्नानंतर दोन वर्षानंतर त्यांचे अविवाहित जीवन यापेक्षा उत्तम होते, असे मानतात त्याचे एक कारण असत. अर्थातच ते आनंदी, सुखी होतात; पण हळूहळू त्यांना त्या सुखाची, आनंदाची सवय होते. लग्नानंतर समाधानाची पातळी घसरण्याची इतरही अनेक कारणे असू शकतात.

# तुम्हाला अशक्तपणाचा सामना करावा लागत असेल तर...



गरजेपेक्षा शरीर मोठे असेल तर त्रास होतो, शरीर अशक्त असल्यांनतही त्रास होतो.


शरीराची काळजी घेतली नाही तर, आजाराचा सामना करावा लागतो. क्षमतेपेक्षा जास्त काम करणे, अवेळी जेवण करणे, पूर्ण झोप न घेणे यासारख्या सवयींचा वाईट परिणाम शरीराच्या कार्यक्षमतेवर पडतो. यामुळे सतत अशक्तपणा जाणवतो.

अशा वेळी खाण्या-पिण्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असते. तुम्हालाही अशक्तपणाचा सामना करावा लागत असेल, थकवा जाणवत असेल किंवा आजारी पडण्याची भिती असेल तर करा हे साधे-सोपे उपाय. अशक्तपणा आला असेल तर दूध, तूप, यासाख्या पदार्थाचा आहारामध्ये मोठ्याप्रमाणात वापर करावा.

शरीरासाठी भरपूर झोप घेणे आवश्यक आहे. गव्हाची चपाती, मुग किंवा हरभरा डाळ, पालक, पपई, मेथी, पत्तागोबी,

फूलगोबीचा आहारात मोठ्या प्रमाणात वापर करावा. याशिवाय प्रत्येक दिवशी, सेफ, अंगुर, मोसंबी या फळांबरोबरच अंजीर, बदाम, पिस्ता, काजूचा वापर करावा.

# प्रेमात हवी असते एकमेकांबद्दल विश्वासाची दृढ इच्छा



प्रेमात हवी असते एकमेकांबद्दल विश्वासाची एक दृढ इच्छा. त्या इच्छेपोटीच आपण हजारो मैलाचे अंतर कापून जाणारे पक्षी पाहिलेत. पण विज्ञानाच्या प्रगतीमुळे आपण एका सेंकदाच्या आत लाखो कि.मी. दूर असून सुद्धा विचारांनी एकत्रित येतो. मात्र, या विज्ञानाच्या प्रगतीने आपण शब्दाने सावरु शकतो आपले नाते. मात्र, याचा देखील वापर जपून करणे गरजेचेच असते. प्रेमापोटी याचा वापर आपण टाळलाच तर समोरच्या व्यक्तीच्या मनात आपल्याबद्दल काय घालमेल चालू असते हे विचार न केलेलेच बरे. प्रत्येकाच्या ठायी प्रेमाला स्थान असते हे स्थान ढासळू नये यासाठी एकमेकांनी काही गोष्टी समजून घेणे गरजेचे असते.

जेव्हा एखादी व्यक्ती जिंकत नाही तेव्हा एखादी व्यक्ती जिंकते, तेव्हाच दुसऱ्याला जिंकण्याचे समाधान मिळते. एखाद्याच्या कामगिरीवर तो किती प्रमाणात इतरांचे आकर्षण बनतो, हे अवलंबून असते. अशी कामगिरी मनापासून आवडत नसली तरी अनेकांना त्यासाठी प्रयत्न करावे लागतात, ही आजकाल समाजा रुढ झालेली बाब आहे. तरुण यासाठी सर्वच बाबतीत पुढे राहण्याचा प्रयत्न करतो. स्त्रिया संपूर्णपणे मुक्त नसतात. लहान मुलगी आधी आपल्या आईशी स्पर्धा आणि त्यानंतर चढाओढ करते. त्यानंतर ती शाळेतील आपली कामगिरी उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न असतो. तिला चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हायचे असते किंवा पहिला क्रमांक पटकावायचा असतो. त्यासाठी ती स्पर्धा करते. ती ज्या माणसाशी लग्न करते, त्याच्याशी स्पर्धा करू पाहते. तिला निश्चित होण्यासाठी आपल्या पतीवर भरपूर प्रेम करावेसे वाटते. ज्या माणसाला काही महत्त्व आहे, काही मान आहे. ज्याच्याकडे चांगली स्थिती आणि पैसा आहे. अशा माणसाशी तिचा विवाह करणे इष्ट वाटते. तिला चांगले लग्न करायचे असते.

पालक आपल्या मुलांच्या स्पर्धात्मक भावनेला खतपाणी घालतात आणि त्यामुळेच घरातील संबंधामध्येही स्पर्धात्मक भावना निर्माण होते. पालकांची मुलांच्या प्रेमासाठी आणि बहीण-भावंडांची पालकांच्या प्रेमासाठी स्पर्धा लागते. शाळेत, मैदानावर स्पर्धेला उत्तेजन दिले जाते. मानासाठी आणि काही गोष्टींच्या प्राप्तीसाठीही आजकाल प्रचंड स्पर्धा करावी लागते. आपल्या सर्वच गोष्टी स्पर्धेशी आणि सामर्थ्याशी जोडल्या गेल्या आहेत. यामागे केवळ इतिहास, परंपरा किंवा धार्मिक गोष्टी नाहीत, तर त्यामागे श्रीमंती, समृद्धीसुद्धा आहे. आपण भरपूर संपत्ती मिळविण्यासाठी आणि आपला मान वाढविण्यासाठी विविध प्रशिक्षणे घेतो, पण प्रेमाच्या क्षमतेसाठी कुठलीही प्रशिक्षण संस्था नाही. कुठल्याही मोठ्या श्रीमंत माणसाला प्रेमाची शाळा काढण्याची इच्छा होत नाही. आपल्या जीवनात भौतिक वस्तूचे व इतर गोष्टींचे महत्त्व वाढले असतानाही आजही प्रत्येकाला जीवनात प्रेम ही मुख्य महत्त्वाची गोष्ट आहे.

आपण भौतिक गोष्टी प्राप्त केल्यानंतर त्यापासून आपल्याला सन्मान मिळतो. थोडेफार समाधानही मिळते. पण हे समाधान परस्परांची आवश्यकता आणि त्यात मिळणारे समाधान देऊ शकत नाही.



# गर्भवती महिलेचा आहार कसा असावा

गर्भवतींच्या त्या काळातील परिस्थितीचा, विचाराचा व वातावरणाचा परिणाम तिच्या पोटी असलेल्या संततीवर होत असतो. याचे भान गर्भवतीच्या कुटुंबियांना असायला हवे; विशेषत: तिच्या पतीला.

गर्भवती महिलेला प्रोटीन व लोह पदार्थांनी परिपूर्ण पौष्टिक आहाराचीही गरज असते. यासाठी दूध, लोणी व हिरव्या पालेभाज्या तिच्या आहारात असायला हव्यात. मुळा, गाजर, टोमॅटो, गाजर यासारके कार्बोहायड्रेट्स, प्रोटिन्स व व्हिटॅमिनयुक्त अन्नही द्यायला हवे

गर्भवती महिला जर मांसाहारी असेल तर वळोवेळी मटण, मासे व अंडीही देऊ शकता. परंतु अंडी व मटण जास्त प्रमाणात देऊ नये ते तिच्या व तिच्या बाळाच्या आरोग्याला हानीकारक असते.

या आवश्यक खाद्य पदार्थांशिवाय गर्भवती महिलेला रात्री झोपण्यापूर्वी सफरचंद, संत्री, मोसंबी, पपई, द्राक्षे अशी प्रोटीनेयुक्त फळे मोसमानुसार खाण्यास द्यावीत. जेणेकरुन खाद्यपदार्थांव्दारे ज्या पौष्टि घटकांची पूर्तता होत नसेल ती फळाव्दारे करता येऊ शकते.

# सुगरणीचा सल्ला

○आपण नेहमी कांदा, बटाटा, केळी, मिरची यांची भजी करतो. गुलबक्षीच्या कोवळ्या पानांची भजी करून बघा. ज्यांना डाळीचे पीठ सोसत नाही, पोटात वात धरतो, त्यांनी गुलबक्षीच्या कोवळ्या पानांची भजी करावी. ही अजिबात बाधत नाही. वृद्ध माणसांना तर फारच चांगली. ही भजी फारच चांगली फुगतात व कुरकुरीत होतात. पाने भाज्यासकट चावून खावीत म्हणजे डाळीचे पीठ बाधत नाही. ही पाने औषधी आहेत.

○ दर वेळेस विकतची चॉकलेट आणण्याऐवजी हे सोपं चॉकलेट घरी बनवून बघा. पाव किलो टोमॅटोचा मिक्सरवर रस काढून गाळून घ्यावा. रसापेक्षा थोडी कमी साखर घालून मंद गॅसवर आटवावे. खवा असल्यास थोडा खवा अथवा आटत आल्यावर थोडीशी पिठीसाखर घालून चॉकलेट-गोळ्यांचे आकार द्यावेत. टोमॅटोच्या रंगामुळे अगदी चॉकलेटसारखी दिसणारी व किंचित आंबटगोड चॉकलेटं तयार होतात. पाव किलो टोमॅटोची पंधरा-वीस चॉकलेटं होतात. कुठला कृत्रिम रंग वा स्वाद लागत नाही.

○ नेहमीप्रमाणे इडलीचे पीठ करून ठेवावे. इडली फ्राय सर्वांनाच खूप आवडतात. पण त्याला तेल खूपच लागते. त्यासाठी पर्याय म्हणून कढईत अर्धा ते पाऊण चमचा तेल घालावे. त्यात सातआठ मोहरीचे दाणे घालावेत. ते तडतडल्यावर इडलीचे पीठ १ डावभर घालावे व झाकून ठेवावे. चारपाच मिनिटांनी खालून खरपूस लाल झाल्यावर परतावे व २ ते ३ मिनिटांनी काढावे. एकदम खमंग इडली फ्राय होतात. सुरवातीला जरा वेळ लागतो. पण एकदा कढई तापली की भराभर सुटून येतात. अजिबात चिकटत नाहीत. 'निर्लेप' कढई असेल तर अगदी थोडे तेल लागते. मोहरीचा स्वादही फायदा होतो.

○ चार चांगले पिकलेले टोमॅटो, २ वाट्या डाळीचे पीठ, एक वाटी तांदळाचे पीठ, तिखट, धनेपूड, जिरेपूड, कोथिंबीर, मीठ, तेल हे सर्व साहित्य मिसळून घ्यावे. हे मिश्रण सरसरीत भिजवावे व तासभर झाकून ठेवावे. नंतर विस्तवावर पसरट तवा ठेवून ते मिश्रण पळीने नीट तव्यावर टाकावे व पातळ पसरावे. दोन मिनिटे झाकून ठेवावे. वाफ आल्यावर उतरवावे. तिखट चटणीबरोबर गरम रूचकर लागते.

○ केकच्या मिश्रणात अंड्यातील पिवळा व पांढरा भाग एकत्र न घालता पांढरा भाग शेवटी घालावा व हे मिश्रण निर्लेप सॉस पॅनमध्ये घालून गॅसवर ठेवावे. पॅनखाली पोळीचा सपाट तवा ठेवावा. गॅस मंद ठेवा. एक तासाने केक छान फुलून येतो. निर्लेप पॅनमुळे केक चिकटत नाही. शिवाय भांड्याला तूपही फारसे लावावे लागत नाही.

○ बहुतेक प्रकारच्या चकल्या करताना तांदूळ वापरला जातो. सर्व धान्ये धुतली नाहीत तरी तांदूळ धुऊन वाळवावेतव नंतर सर्व धान्ये एकत्र दळावी. तांदूळ धुऊन एक तास पाण्यात भिजत ठेवावेत व या पाण्यात तुरटी फिरवावी. नंतर तांदूळ निथळून वाळवून दळावेत. अशा प्रकारे केलेली चकली अतिशय हलकी होते.

○ केकसाठी आयसिंग करताना जर आयसिंग जास्त पातळ झाले, तर नक्षी चांगली येत नाही. त्यासाठी आयसिंगमध्ये थोडे कॉर्नफ्लोअर मिसळावे किंवा घरच्या घरी आयसिंग शुगर तयार करावी. ती अगदी कमी वेळात व अल्प किमतीत तयार होते. पाव किलो पिठीसाखरेत, (पिठीसाखर घरी मिक्सरमध्ये) करावी. बाजारच्या पिठीसारखेत खूप कचरा असतो). साधारण एक ते सव्वा टेबलस्पून कॉर्नफ्लोअर घालून पिठीच्या चाळणीने ३ ते ४ वेळा चाळावे म्हणजे मिश्रण चांगले एकजीव होते.

# कॉर्पोरेट क्षेत्र आणि सामाजिक संस्थांच्याधील समन्वयाने आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यात येणार : मंत्री आबिटकर

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : शासन, कॉर्पोरेट क्षेत्र आणि सामाजिक संस्थांच्याधील समन्वयाने राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यात येणार असल्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र प्रभाव आणि शाश्वतता अभिसरण कार्यक्रम' अंतर्गत 'प्रभाव अभिसरण' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य विभागचे प्रधान सचिव, डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रविंद्रन, तसेच कुटुंब कल्याण आयुक्त व राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे प्रमुख उपस्थित होते.



मंत्री आबिटकर म्हणाले की, दुर्गम व आदिवासी भागांमध्ये आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी (सीएसइार)चा प्रभावी वापर होणे आवश्यक आहे. पायाभूत सुविधा उभारणीसाठी संस्थांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. केवळ औपचारिकता न ठेवता प्रत्यक्ष योगदान दिल्यास आरोग्य क्षेत्रात मोठा बदल घडू शकतो.

सार्वजनिक आरोग्य विभागासोबत सातत्याने समन्वय साधत सीएसआर उपक्रम राबविल्यास राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम व प्रभावी होईल, असे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

कॉर्पोरेट कंपन्यांच्या प्रतिनिधींशी सामाजिक दायित्व (सीएसआर) संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, विविध संस्थांनी सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून आरोग्य विभागाशी समन्वय साधून काम केल्यास राज्यातील आरोग्य सुविधा निश्चितच सुधारतील.


यावेळी 'महाराष्ट्रात आरोग्य सेवा वितरणाचे सक्षमीकरण' या विषयावर सहयोगात्मक चर्चा आयोजित करण्यात आली. शासनाच्या प्राधान्यक्रमातील प्रकल्पांची रूपरेषा मांडत भागीदारीच्या संधींचा आढावा घेण्यात आला. विकास क्षेत्रातील अग्रणी संस्थांनी त्यांच्या आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती देत अंमलबजावणीतील अडचणी, त्रुटी आणि आव्हाने यावर प्रकाश टाकला. तसेच, उच्च-प्रभावी व विस्तारक्षम उपक्रमांची संयुक्त निवड करण्यावर भर देण्यात आला.

यावेळी हृदयविकाराच्या आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत उपलब्ध व्हावी यासाठी एईडी (ऑटोमेटेड एक्सटर्नल डिफिब्रिलेटर) आणि सीपीआर (बेसिक लाईफ सपोर्ट) प्रशिक्षणाचा व्यापक प्रसार करण्यासाठी शासन, संस्था आणि नागरिकांनी संयुक्तपणे काम करण्याचा निर्धार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी धोरणात्मक सल्लागार डॉ. संतोष भोसले यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाची पार्श्वभूमी सांगितली. त्यानंतर प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक यांनी राज्य शासनाची आरोग्यविषयक दृष्टी आणि विविध घटकांमधील अभिसरणाची आवश्यकता असल्याचे सांगितले.

## ३०-३१ मार्च दरम्यान राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : सध्या राज्यातील काही भागात अंशत: आभाळी हवामान असून ही स्थिती या आठवड्यात कायम राहण्याची शक्यता आहे. राज्याच्या दक्षिण भागांमध्ये दुपारनंतर स्थानिक स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो. हा पाऊस प्रामुख्याने कर्नाटक व तेलंगणा सीमेलगत असलेल्या मराठवाडा, मध्य महाराष्ट्र व विदर्भातील सीमावर्ती भागांमध्ये राहण्याची शक्यता आहे.

३० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. उर्वरित विदर्भात देखील हवामानात बदल दिसू शकतो. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता नाकारता येत नाही. ३१ मार्च रोजीदेखील राज्याच्या काही भागांमध्ये या हवामानाचा परिणाम दिसू शकतो. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## सिंधुदुर्गात आंबा-काजू शेतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रकल्प राबविणार : मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबा आणि काजू पिकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. सुरवातीला काजू व आंब्यासाठी प्रत्येकी २०० शेतकऱ्यांची निवड करून प्रकल्प सुरू केला जाणार आहे. त्यात आंबा आणि काजू उत्पादकांचा समावेश आहे, असे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबा आणि काजू पिकांसंदर्भात एआयचा वापर करण्याबाबत बारामती एडीटी कृषी विज्ञान केंद्र विषयतज्ञ निलेश नलावडे यांनी सादरीकरण केले. यावेळी दापोली कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे, संचालक (कृषी व नवोपक्रम) डॉ. भूषण गोसावी, एडीटी कृषी विज्ञान केंद्र बारामतीचे विषय तज्ज्ञ (मृदा विज्ञान) डॉ. विवेक भोईटे, सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला, सिंधुदुर्ग डॉ. वैभव शिंदे , धोरणात्मक सल्लागार डॉ. संतोष देशमुख, शास्त्रज्ञ



डॉ. संजनी साळुंखे उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी उपस्थित होते.

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे म्हणाले, प्रकल्पासाठी शेतकऱ्यांचा मूलभूत डेटा, नाव, संपर्क क्रमांक, गाव आदी माहिती संकलित करून त्यांच्या शेतीचे डिजिटायझेशन करावे. पहिल्या दोनशे शेतकऱ्यांमध्ये प्रकल्प यशस्वीपणे राबविल्यानंतर मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यात येईल. हा प्रकल्प यशस्वी झाल्यावर इतर शेतकरीही स्वयंस्फूर्तीने या तंत्रज्ञानाचा स्वीकार करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


## सुजलाम सुफलाम सावनेरच्या विकासाच्या दिशेने सुरुवात : मुख्यमंत्री फडणवीस

जनप्रवास : प्रतिनिधी

नागपूर : सावनेरच्या मुख्य रस्त्याचे सौंदर्यीकरण व मौनीबाबा आश्रमाचे भूमिपूजन आज झाले. खत आणि कोल गॅसिफिकेशन असे दोन मोठे प्रकल्प या भागात उभे राहणार आहेत यातून ४० हजारावर रोजगार निर्मिती होणार आहे. या सर्व प्रकल्पांमधून सुजलाम- सुफलाम सावनेर होण्याच्या दिशेने सुरुवात झाल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

जगात युद्धाची परिस्थिती असताना भारत विश्वशांतीच्या दिशेने विचार करतो आणि विश्वशांतीसाठी विश्व महाआरतीचे सावनेर मध्ये झालेले आयोजन भूषणावह असल्याच्या भावना व्यक्त करून महाआरतीच्या गिनिज बुक ऑफ रेकॉर्डसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

श्री रामनवमीच्या पवित्र पर्वावर सावनेर नगरपरिषद मैदानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाआरती विश्व विक्रमी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच विकास कामांचे ऑनलाईन भूमिपूजनही त्यांचा हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.



महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्य मंत्री ड आशिष जयस्वाल,आमदार डॉ. आशिष देशमुख ,माजी मंत्री रणजित देशमुख आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रभु राम हे आपले आदर्श आहेत. समाजात कोणी लहान मोठे नसून सर्व समान असल्याची शिकवण देऊन त्यांनी युगधर्म मांडला. त्याच प्रभु रामांच्या जन्मदिनी रामनवमीला सावनेरचा मुख्य रस्ता सौंदर्यीकरण प्रकल्प आणि रघवी समाजाचे थोर संत मौनीबाबा यांच्या आश्रमाचे बांधकाम व सौंदर्यीकरण कामाचे भूमिपूजन झाले. सावनेर मतदार संघाचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी या भागात कोल गॅसीफिकेशन प्रकल्प आणि खत प्रकल्पसाठी केंद्र व राज्य शासनाकडे सतत पाठपुरावा केला. येत्या काळात हे दोन मोठे प्रकल्प या भागात उभे राहणार असून याद्वारे जवळपास ४० हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. या सर्व कामांद्वारे या भागाच्या विकासाला चालना मिळेल व हा भाग सुजलाम-सुफलाम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय रस्ते निधीच्या २६ कोटी रुपयातून सावनेर मुख्य रस्ता सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे तर ५ कोटी खर्चातून मौनीबाबा आश्रम उभारणी व सौंदर्यीकरण होणार आहे.

तत्पूर्वी ,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,महसूल मंत्री तथा पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल यांच्यासह ४९११ भक्तांनी गणपतीची महाआरती केली. याच कार्यक्रमात गिनीज बुक ऑफ रेकॉर्डच्या भारतातील अधिकाऱ्याने या महाआरतीचा हा गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. आमदार डॉ आशिष देशमुख यांनी प्रास्ताविक केले.

## वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाबाबत विशेष टप्पा - ३ अंतर्गत जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा परिषद, मुंबई शहर आयोजित मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामध्ये मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, वडाळा (मुंबई शहर), आदर्श नगरसेवक समितीचे बाल विकास मंदिर, मराठी माध्यमिक शाळा, वरळी आणि डॉ. आंबेडकर महाविद्यालय, वडाळा येथील एनसीसीचे विद्यार्थी तसेच मुंबई शहरातील अनेक खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, वडाळा येथील प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. जे. एम. होटकर यांच्या हस्ते मॅरेथॉनला झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. बीपीसीए महाविद्यालय वडाळा-नायगाव क्रॉस रोड-नॅशनल मार्केट सिग्नल-वडाळा स्टेशन-बीपीसीए महाविद्यालय वडाळा असा मॅरेथॉनचा मार्ग होता.




मॅरेथॉन स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी नीलिमा अडसूळ यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली. या उपक्रमासाठी क्रीडा कार्यकारी अधिकारी साहिल उतेकर, समृद्धी देवळेकर, क्रीडा अधिकारी अनिल घुगे, नेहा साप्ते, तसेच क्रीडा मार्गदर्शक फुलचंद कराड, अक्षय थोरात, प्रा. डॉ. नितू जोशी, प्रा.डॉ. रोहिणी कवडे, प्रा.डॉ. कैलास असाई, डॉ. किशोर मारू, डॉ. सुषमा चुगुळे, डॉ. राजेंद्र शेळके, डॉ. राजेंद्र धाकणे, कीडवाई नगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तावडे, भोईवाडा वाहतूक पोलीस स्टेशनचे सरदार नाळे उपस्थित होते.

या कार्यक्रमांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ए विभाग कार्यालयात 'वंदे मातरम' गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ए विभाग कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच मुंबई शहर जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालयात वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायनाचे आयोजन करण्यात आले, यावेळी अपर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात, निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शिवनंदा लंगडापूरे आणि वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये निबंध स्पर्धेचे नुकतेच यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धा २४० शाळांमध्ये घेण्यात आल्या. या स्पर्धेत ११,६९७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

## संगीत आणि तंत्रज्ञानाचा संगम घडवणारा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम : मंत्री आशिष शेलार

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विरासत आणि विकास या संकल्पनेनुसार राज्य शासन काम करत आहे. महाराष्ट्राची समृद्ध परंपरा, कला, साहित्य, लोकसंगीत आणि संस्कृती आधुनिक पद्धतीने जगासमोर मांडण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ड आशिष शेलार यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरा, ऐतिहासिक वारसा आणि राष्ट्राभिमान यांचे भव्य व नेत्रदीपक दर्शन घडविणारा



अभूतपूर्व ड्रोन शो मुंबई येथे आयोजित करण्यात आला, त्या कार्यक्रमाच्या उद्घाटनपर भाषणात ते बोलत होते. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सचिव डॉ.किरण कुलकणी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे तसेच या ड्रोन शोचा आनंद घेण्यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी असून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कर्तृत्वातून प्रेरणा घेऊन सांस्कृतिक वारसा जपला जात असल्याचे मंत्री ड शेलार यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील संस्कृती ही सॉफ्ट पॉवर म्हणून विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील सांस्कृतिक कार्यक्रमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आल्याची माहिती देताना मंत्री शेलार म्हणाले की, पूर्वी दरवर्षी ३००-३५० कार्यक्रम होत असताना आता १२०० हून अधिक कार्यक्रम राज्यभर आयोजित केले जात आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह इतर सहकाऱ्यांच्या मदतीने हा विस्तार साध्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

## कला विश्व

### जोडीदाराची गरज, मलायका अरोराने १९ वर्षांनी लहान सोराब बेदीला डेट करण्याच्या चर्चांबद्दल सोडलं मौन

बॉलीवूडची 'छैय्या छैय्या' गर्ल, अभिनेत्री मलायका अरोरा तिच्या खासगी आयुष्यामुळे नेहमीच चर्चेत असते. अर्जुन कपूरबरोबर ब्रेकअप झाल्यानंतर मलायकाचे नाव अनेक व्यक्तींशी जोडलं गेलं. काही काळापूर्वी मलायका मॉडेल सोराब बेदीबरोबर डान्स करताना दिसली होती, त्यानंतर ते दोघे रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. आता मुलाखतीत मलायकाने या बातम्या केवळ अफवा असल्याचे स्पष्ट केलं आहे. मलायका म्हणाली, आता मला या गोष्टींचा कंटाळा होतो. अरहान आणि मी, आम्ही दोघेही या चर्चांवर हसत असतो. ५० वर्षीय



मलायकाने पुढे सांगितलं की, या गोष्टी प्लॅन नसतात, जर काही घडायचं आहे ते घडणारच. सध्या आयुष्यात जे काही सुरू आहे, त्यात ती आनंदी आहे. पुन्हा शून्यातून सर्वकाही सुरू करण्याची तिची जिद्द तिला पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. मलायका अरोराच्या मते, जोडीदार असणं किंवा कोणीतरी सोबत असणं या छान गोष्टी आहेत, पण तिला आता पार्टनरची गरज वाटत नाही. मलायका म्हणाली, जर मला कोणाबरोबर राहायचं असेल, तर मी माझ्या अटींवरच राहीन. ३१ वर्षांचा सोराब बेदी हा एक मॉडेल आणि टीव्ही सेलिब्रिटी आहे. तो सोशल मीडियावर खूप लोकप्रिय असून 'चढत डश्रिळींीींळश्रश्रर द६' मध्ये दिसला होता. मलायका बरोबरचे फोटो व व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर

सोराबने सुद्धा या अफवांवर प्रतिक्रिया दिली होती. त्यानेही मलायकाबरोबरच्या अफेअरच्या बातम्यांचे खंडन केले होते आणि ती चांगली मैत्रीण असल्याचं तिने म्हटलं होतं. मलायका अरोराच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलायचं झाल्यास तिने १९९८ मध्ये अरबाज खानशी लग्न केलं होतं. १९ वर्षांनंतर २०१७ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. त्यांना अरहान नावाचा मुलगा असून ते दोघे मिळून त्याचा सांभाळ करतात. अरबाजपासून घटस्फोट घेतल्यावर मलायका अर्जुन कपूरला डेट करू लागली. पण नंतर त्यांचं ब्रेकअप झालं. दुसरीकडे, अरबाज खानने शुरा खान हिच्याशी दुसरं लग्न केलं आणि त्यांना एक मुलगी आहे.

### भूमी पेडणेकरने ब्रँड बॅकबे नावाने व्यवसाय सुरू केला असून अर्धा लिटर पाण्याची बाटली विकून कमावते १५० रूपये?

इंडस्ट्रीत असे अनेक कलाकार आहेत जे अभिनयाव्यतिरिक्त वेगळ्या क्षेत्रातही व्यवसाय करत असतात. काही हॉटेलचे मालक आहेत, काहींचा कपड्यांचा ब्रँड आहे. यापैकीच एक म्हणजे बॉलीवूडमधील मराठमोळा चेहरा भूमी पेडणेकर. भूमीसुद्धा स्वत:चा व्यवसाय करत आहे. भूमी पेडणेकर बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिनं आतापर्यंत अनेक सिनेमांमध्ये आणि वेब सीरिजमध्ये काम केलं आहे. सध्या अभिनेत्री तिच्या व्यवसायामुळे चर्चेत आहे. २०२५ मध्येच अभिनेत्रीनं हा व्यवसाय सुरू केलेला. भूमी पेडणेकरचा व्यवसाय नेमका कोणता आहे आणि ती का चर्चेत आहे, याबद्दल जाणून घेऊयात भूमीनं २०२५ मध्ये तिचा ब्रँड बॅकबे सुरू केला होता. ती प्रीमियम वॉटरची विक्री करते. परंतु, यासाठी तिला खूप ट्रोल करण्यात आलेलं. ५००मि. ली इतकं पाणी ती जवळपास १५० रुपयांना विकत होती आणि ७५० मि.ली जवळपास २०० रुपयांना. अशातच आता मुलाखतीत तिनं सुरू केलेल्या पाण्याच्या व्यवसायाचं रूपांतर तिनं आता पेय पदार्थांमध्ये केल्याची माहिती दिली आहे. येत्या काळात लवकरच ती स्पार्कलिंग वॉटरसुद्धा लाँच करणार आहे. यावेळी तिनं तिचा ब्रँड महागडा असला तरी इतर ब्रँडसुद्धा त्या किमतीत विक्री करत असल्याचं म्हटलं आहे. जय मदनशी संवाद साधताना भूमी म्हणाली, आम्ही नैतिकदृष्ट्या ही कंपनी चालवत आहोत. आम्ही जे काही विकत आहोत ते सगळं चांगल्या दर्जाचंच असणार याची काळजी घेतो आणि आम्हाला मजा येत आहे. भूमी पुढे



म्हणाली, आम्ही आता वॉटर ब्रँड चालवत नाहीये तर आता पेय पदार्थांचा ब्रँड सुरू केला आहे. आम्हाला एक चांगला ब्रँड तयार करायचा आहे. आपला ब्रँड महाग उत्पादनं विकत असल्याची कबुली देत ती म्हणाली, हो, माझं पाणी महाग आहे यात काही शंका नाही. पण, मी ज्या श्रेणीत आहे, म्हणजेच प्रीमियम वॉटर कॅटेगरीत त्याच श्रेणीतील जुन्या परंपरागत मोठे ब्रँड्स ज्यांच्याशी मी स्पर्धा करू शकत नाही असं मला सांगितलं जात होतं. त्यांचं पाणी माझ्यापेक्षा खूपच महाग आहे. भारतात आपण अनेक आंतरराष्ट्रीय ब्रँड्सची पेयं पितो आणि त्यासाठी तुम्ही ४००-५०० रुपये मोजता. भूमीने सांगितले की, सुरुवातीपासूनच तिला हे स्पष्ट होते की हा प्रोडक्ट प्रीमियम आहे आणि मोठ्या प्रमाणावरच्या (मास) बाजारासाठी नाही. तसंच ती म्हणाली की, मास मार्केटमध्ये प्रवेश करताना ती अजून एक ब्रँड लाँच करेल. सध्या बॅकबेच्या वेबसाइटवर ५०० मि.ली. (१२ बाटल्यांचा पॅक) १,५५६ रुपयांना विकला जात आहे, म्हणजे प्रति बाटली सुमारे १२९.६ रुपये. तर ७५० मि.ली. (१२ बाटल्यांचा पॅक) २,१११ रुपयांना उपलब्ध आहे, म्हणजे प्रति बाटली अंदाजे १७६ रुपये.

* मुख्य संपादक - संजय प्रल्हाद भोकरे * संपादक -सिद्धार्थ संजय भोकरे * सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com